रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक २६१
www.ramprahar.com
◆ शुक्रवार, १० एप्रिल २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## विश्वासाचे स्थिर सरकार भाजपच देऊ शकतो -पीएम मोदी



**हल्दिया (प. बंगाल) :** केंद्र आणि राज्यात एकाच पक्षाचे सरकार असल्यास विकासाला गती मिळते. ज्या राज्यांमध्ये भाजप सत्तेत आहे, तिथे विकास आणि विश्वासाचे वातावरण तयार केले जाते आणि असेच मॉडेल बंगालमध्ये राबवले जाईल, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी (दि.९) केले. पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीदरम्यान हल्दिया येथे झालेल्या सभेत ते बोलत होते. यावेळी त्यांनी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेस सरकारवर जोरदार हल्ला चढवला. गुंतवणुकीचे वातावरण भीतीतून नव्हे, तर विश्वासातून निर्माण होते आणि तो विश्वास केवळ भाजपच देऊ शकते, असे पंतप्रधान मोदी म्हणाले. ही निवडणूक सामान्य नसून बंगालचे वैभव पुन्हा स्थापित करण्याची निवडणूक आहे, असेही त्यांनी नमूद केले.

अंतरंग
बालविवाहप्रकरणी पतीसह चौघांवर गुन्हा दाखल/२
बहिणीच्या प्रियकराचा खून; आरोपीला जन्मठेप/५
रायगड जिल्हास्तरीय बास्केटबॉल निवड चाचणी/८

# आदिवासी विकासमंत्री डॉ. अशोक वुईके यांची पनवेलमधील कातकरी वस्तीला भेट

## ■ शासकीय योजनांच्या अंमलबजावणीचा घेतला आढावा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका क्षेत्रातील प्लॉट क्रमांक ५३८ ए येथील कातकरी समाजाच्या मालकी हक्काच्या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी राज्याचे आदिवासी विकासमंत्री डॉ. अशोक वुईके यांच्या उपस्थितीत गुरुवारी (दि. ९) पनवेलमध्ये महत्त्वपूर्ण बैठक झाली. या बैठकीपूर्वी मंत्री डॉ. वुईके यांनी संबंधित ठिकाणी प्रत्यक्ष भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला.

यावेळी झालेल्या बैठकीत कातकरी समाजाच्या मालकी हक्काच्या प्रश्नावर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावर लवकरात लवकर तोडगा काढण्यासाठी आवश्यक कार्यवाही, प्रशासकीय पातळीवरील समन्वय आणि पुढील दिशा यावर विचारमंथन करण्यात आले.

या दौऱ्याचे नियोजन आदिवासी विकास विभागाच्या ठाणे अपर आयुक्त कार्यालयामार्फत करण्यात आले होते. यावेळी महापौर नितीन पाटील, उपमहापौर प्रमिला पाटील, आदिवासी विकास विभाग ठाणे अप्पर आयुक्त गोपीचंद कदम, आयुक्त मंगेश चितळे, भाजप जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, प्रांत अधिकारी पावन चांडक, भाजप जिल्हा उपाध्यक्ष मयुरेश नेतकर, शहर सरचिटणीस रूपेश नागवेकर, सतीश पाटील, मनपा अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, महेशकुमार मेघमाळे, प्रकल्प अधिकारी तेजस्विनी गलांडे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

प्रारंभी मंत्री डॉ. अशोक वुईके यांनी आदिवासी वस्तीवर भेट दिली. परिसराची पाहणी करून महसूल विभाग व पनवेल महापालिकेच्या अधिकाऱ्यांकडून याबाबत सविस्तर माहिती घेतली. यावेळी तेथील समाजमंदिरामध्ये बैठक घेऊन कातकरी बांधवांशी चर्चा करून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. (पान २वर..)





**कातकरी समाजाचा प्रश्न सकारात्मक पद्धतीने सोडविण्यात येईल. पुढील तीन महिन्यांच्या कालावधीत पनवेलच्या शहरी भागात राहणाऱ्या सर्व आदिवासी कुटुंबांकडे जात प्रमाणपत्र, आधार कार्ड, रेशन कार्ड इत्यादी आवश्यक कागदपत्रे असतील तसेच पात्र सर्व नागरिकांना योजनांचा लाभ मिळेल याची काळजी प्रशासनाने घ्यावी. पीएम जनमन योजनेच्या माध्यमातून पायाभूत सुविधा, राणी दुर्गावती आदिवासी महिला सक्षमीकरण योजनेच्या माध्यमातून जास्तीत जास्त महिलांना लाभ देण्यात यावा.**
**-डॉ. अशोक वुईके,**
आदिवासी विकासमंत्री



**पनवेल : राज्याचे आदिवासी विकासमंत्री डॉ. अशोक वुईके यांनी गुरुवारी पनवेलचा दौरा केला. या दौऱ्यादरम्यान त्यांची माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भेट घेऊन स्वागत केले तसेच विविध विषयांवर चर्चा केली. यावेळी आमदार महेश बालदी, भाजपचे जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, महापौर नितीन पाटील, सभागृह नेते अ‍ॅड. प्रकाश बिनेदार आदी उपस्थित होते.**

## नाशिकमधील आयटी कंपनीतील प्रकार गंभीर

### सखोल तपास करणार -मुख्यमंत्री



**बीड : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी (दि.९) बीड जिल्ह्यातील गहिनीनाथ गडावर ९४व्या नारळी सप्ताहाला उपस्थिती दर्शविली. यावेळी मुख्यमंत्र्यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना नाशिकमधील आयटी कंपनीत घडलेला प्रकार गंभीर असून त्याची सखोल चौकशी करणार असल्याचे सांगितले.

नाशिक शहरातील एका नामांकित बहुराष्ट्रीय कंपनीत महिलांचा विनयभंग, लैंगिक व मानसिक अत्याचार तसेच धार्मिक भावना दुखावल्याच्या घटना घडल्या. या प्रकरणी आतापर्यंत एकूण नऊ गुन्हे दाखल झाले असून सहा संशयितांना अटक करण्यात आली आहे. तक्रारदारांमध्ये आठ महिला, तर एका युवकाचा समावेश आहे. या युवकाच्या धर्मांतराचा प्रयत्न झाल्याचे समोर आले. या गुन्ह्यांची व्याप्ती, गांभीर्य व संवेदनशीलता लक्षात घेऊन सखोल तपास करण्यासाठी विशेष तपास पथक अर्थात 'एसआयटी'चीही स्थापना करण्यात आली आहे.

नाशिकमधील घटनेबाबत बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, नाशिकमध्ये पोलिसांनी उघडकीला आणलेले आयटी कंपनीतील प्रकरण अतिशय गंभीर आहे. एखाद्या टेक्निकल कंपनीमध्ये अशा प्रकारे गोष्टी घडणे धक्कादायक आहे. या सगळ्याचा तपास सखोल केला जाईल.

## पोलादपूरमध्ये नदीत बुडून तरुणाचा मृत्यू

**पोलादपूर : प्रतिनिधी**

पोलादपूर तालुक्यातील रानबाजिरे येथील एका तरुणाचा सावित्री नदीपात्रात बुडून मृत्यू झाला आहे.

कापडे बुद्रुक ग्रामपंचायत हद्दीतील रानबाजिरे येथील रहिवासी गणेश एकनाथ पारकर हा तरुण सोमवारी सायंकाळी सावित्री नदीपात्रात पोहण्यासाठी उतरला होता, मात्र खोल पाण्याचा अंदाज न आल्याने तो बुडाला. त्याचा मृतदेह बुधवारी सायंकाळी सापडला. पोलादपूर ग्रामीण रुग्णालयामध्ये त्याचे शवविच्छेदन करण्यात आले. याबाबत पोलिसांकडून अधिक तपास सुरू आहे.

## बारामती पोटनिवडणुकीतून काँग्रेसची अखेर माघार

**पुणे : प्रतिनिधी**

बारामती विधानसभा पोटनिवडणुकीतून काँग्रेसने माघार घेतली आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर बारामतीची पोटनिवडणूक जाहीर झाली असून ती २३ एप्रिल रोजी होणार आहे. या निवडणुकीत काँग्रेसने उमेदवार दिला होता. दरम्यान, अर्ज मागे घेण्याच्या गुरुवारी (दि.९) शेवटच्या दिवशी काँग्रेसचे उमेदवार आकाश मोरे यांनी माघार घेतली.

या पार्श्वभूमीवर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, अजित पवार हे महाराष्ट्राचे मोठे नेते होते. त्यांचे अपघाती निधन महाराष्ट्राला चटका लावणारे आहे. त्यामुळे आम्हाला जी भावनिक साद देण्यात आली त्याचा विचार आम्ही केला. या निवडणुकीत काँग्रेसने उमेदवार देऊ नये म्हणून आम्हाला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने विनंती केली. उपमुख्यमंत्री व उमेदवार सुनेत्रा पवार यांनी फोन केला होता. अजित पवार राष्ट्रवादी पक्षाचे विविध नेतेही आम्हाला भेटले. यानंतर आम्ही बारामतीच्या पोटनिवडणुकीतून माघार घेण्याचा निर्णय घेतला. दरम्यान, उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी ३० उमेदवारांनी अर्ज माघारी घेतले आहेत. २३ एप्रिल रोजी मतदान प्रक्रिया आहे.

## निवडक

### सिक्कीममध्ये पर्यटकांच्या बचावासाठी ऑपरेशन हिम सेतू

**गंगटोक :** भारतीय लष्कराच्या त्रिशक्ती कॉर्प्सने उत्तर सिक्कीममधील लाचेन येथे खराब हवामान आणि मुसळधार बर्फवृष्टीमुळे अडकलेल्या पर्यटकांच्या सुटकेसाठी 'ऑपरेशन हिम सेतू' सुरू केले आहे. हे बचावकार्य टप्प्याटप्प्याने केले जात आहे. आतापर्यंत १३५ पर्यटकांना सुरक्षितपणे वाचवण्यात आले असून ३२ हलकी वाहने आणि १० मोटारसायकलीही बाहेर काढण्यात आल्यात.

### पार्थ पवार यांनी घेतली राज्यसभा खासदारकीची शपथ

**नवी दिल्ली :** राष्ट्रवादीचे युवा नेते पार्थ पवार यांनी गुरुवारी (दि.९) राज्यसभेच्या खासदारकीची शपथ घेतली. संसद भवनात उपराष्ट्रपती सी.पी.राधाकृष्णन यांनी पार्थ यांना खासदारकीची शपथ दिली. यावेळी आई उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासह राष्ट्रवादीचे प्रमुख नेते उपस्थित होते. विशेष म्हणजे वडील स्व. उपमुख्यमंत्री अजित पवारांप्रमाणे शपथविधी सोहळ्यासाठी पार्थ यांनीही गुलाबी रंगाचे जॅकेट परिधान केले होते.




**उरण : मध्य पूर्वेतील युद्धाच्या तब्बल सव्वा महिन्यानंतर होर्मुझची सामुद्रधुनी यशस्वीपणे पार करून ग्रीन आशा हे भारतीय जहाज १५ हजार ४०० मेट्रिक टन एलपीजी घेऊन गुरुवारी जेएनपीए बंदरात दाखल झाले. इराण विरुद्ध अमेरिका, इस्रायल यांच्यातील युद्ध सुरू झाल्यापासून जेएनपीए येथे पोहचणारे हे अशा प्रकारचे पहिलेच जहाज आहे. या जहाजावरील कर्मचारीही सुरक्षित आहेत. जेएनपीए बंदरात जहाजाचे जोरदार स्वागत करण्यात आले.**

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून कोल्हापूरच्या न्यू कॉलेजला २५ लाखांची देणगी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सामाजिक बांधिलकी जपत शैक्षणिक क्षेत्राच्या विकासासाठी सातत्याने योगदान देणारे दानशूर व्यक्तिमत्व थोर देणगीदार माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी कोल्हापूर येथील प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊस संचलित न्यू कॉलेजच्या नवीन इमारतीच्या बांधकामासाठी तब्बल २५ लाख रुपयांची भरघोस देणगी जाहीर केली आहे.



या मदतीचा धनादेश गुरुवारी (दि.९) पनवेल येथे आयोजित छोटेखानी कार्यक्रमात बोर्डिंगचे चेअरमन डॉ.के.जी. पाटील यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला. यावेळी न्यू कॉलेजचे प्राचार्य डॉ.व्ही.एम. पाटील, डॉ. अशोक भोईटे, अ‍ॅड. राहुल घरत तसेच संस्थेचे पदाधिकारी, शिक्षक उपस्थित होते.

यावेळी बोलताना मान्यवरांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या शैक्षणिक, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील भरीव कार्याचा उल्लेख केला. शिक्षण हीच खरी समाजपरिवर्तनाची किल्ली असून गुणवत्तापूर्ण आणि आधुनिक सुविधा विद्यार्थ्यांपर्यंत पोहचणे अत्यावश्यक आहे, या भूमिकेतून त्यांनी ही मदत जाहीर केली असल्याचे सांगण्यात आले.

न्यू कॉलेजच्या वाढत्या शैक्षणिक गरजा लक्षात घेता नव्या इमारतीची आवश्यकता भासत होती. लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी दिलेल्या २५ लाख रुपयांच्या मदतीमुळे बांधकामाच्या कामाला मोठी गती मिळणार असून विद्यार्थ्यांना प्रशस्त वर्गखोल्या, अत्याधुनिक सुविधा आणि उत्तम शैक्षणिक वातावरण उपलब्ध होण्यास मदत होणार आहे.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी यापूर्वीही विविध शैक्षणिक संस्था, क्रीडा उपक्रम, सामाजिक कार्यक्रम आणि आपत्तीग्रस्तांना मदत करून समाजातील विविध घटकांना भक्कम आधार दिला आहे. त्यांच्या या योगदानामुळे अनेक विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वाटचालीला नवे बळ मिळाले आहे.

या उल्लेखनीय योगदानाबद्दल संस्थेच्या वतीने लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे आभार व्यक्त करण्यात आले असून त्यांच्या या सामाजिक बांधिलकीचे कौतुक होत आहे.

## कर्जतमध्ये बैलगाडी शर्यत रंगली

### शंभू-रायबा जोडीने मारली बाजी; विजेत्यांना बक्षिसे



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील कळंबजवळील बोरीचीवाडी येथे आमदार केसरी बैलगाडा शर्यतीचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये राज्याच्या १५ जिल्ह्यांतील नामांकित ४५० बैल सहभागी झाले होते. अंतिम फेरीत सात बैलगाड्यांची शर्यत रंगली, ज्यात बदलापूर येथील मोहन राऊत यांचा शंभू आणि मढवी ग्रुपचा रायबा या बैलजोडीने बाजी मारत पहिला क्रमांक पटकाविला.

पंचायत समितीचे माजी उपसभापती मनोहर थोरवे यांच्या संकल्पनेतून आणि अखिल भारतीय बैलगाडा शर्यत असोसिएशन आयोजित बैलजोडी शर्यतीचा थरार रंगला. अंतिम सामना पाहण्यासाठी आमदार महेंद्र थोरवे यांच्यासह टायगर ग्रुपचे तानाजी जाधव, पनवेल येथील गुरूनाथ फडके, युवासेना जिल्हा युवा अधिकारी प्रसाद थोरवे, शिवसेना विधानसभा संघटक शिवराम बदे, जिल्हा संघटक संभाजी जगताप, तालुकाप्रमुख सुदाम पवाळी, संघटक दिलीप ताम्हाणे, रमेश मते आदी उपस्थित होते.

अंतिम फेरीत ज्या सात नामांकित गाड्यांचे बैल होते, त्यात स्व. पंढरीशेठ फडके यांचा सर्जा, संतोष तोडकर यांचा मल्हार, निलेश चौधरी यांचा बकासुर, ईगल ग्रुपचा प्रधान, शनिशिंगणापूर फॅन क्लबचा चित्या, दहिवली बदलापूर यांचा रत्ना, बाळू पाटील मोहो पनवेल यांचा पक्षा, नावडे येथील खानावकरांचा चिन्या, पाचवड येथील हरण्या, मढवी ग्रुपचा रायबा, प्रवीण राऊत ग्रुपचा शंभू, लखन आणि एकविरा प्रसन्न ग्रुप सर्जा यांचा समावेश होता.

प्रथम क्रमांक मिळवणाऱ्या बैलगाडा मालकास (शंभू-रायबा बैलजोडी) चारचाकी थार गाडी आणि आमदार केसरी ढाल, द्वितीय क्रमांकास (चिक्या-हरण्या बैलजोडी) चारचाकी गाडी अल्टो व ढाल, तृतीय क्रमांकास (रैना-प्रधान बैलजोडी) बुलेट गाडी व ढाल. पुढील चार विजेत्यांना टू व्हीलर आणि आकर्षक ढाल बक्षीस म्हणून देण्यात आली.

## भोंदू खरातला पाच दिवसांची पोलीस कोठडी

**नाशिक : प्रतिनिधी**

महिलांचे लैंगिक शोषण करणारा भोंदूबाबा अशोक खरात याला तिसऱ्या गुन्ह्याप्रकरणी बुधवारी विशेष तपास पथकाने (एसआयटी) ताब्यात घेतले होते. गुरुवारी (दि. ९) त्याला नाशिक न्यायालयात हजर केले असता पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

अशोक खरातवर आतापर्यंत एकूण १४ गुन्हे दाखल झाले असून त्यापैकी आठ गुन्हे लैंगिक शोषणाचे आहेत. सध्या ज्या गुन्ह्यासाठी त्याला अटक करण्यात आली आहे, त्यात त्याने एका सात महिन्यांच्या गरोदर महिलेवर अत्याचार केल्याचा गंभीर आरोप आहे. पीडित महिलेच्या पतीला 'तुझ्या पत्नीला दुष्ट शक्तींपासून वाचवावे लागेल आणि तिला मुलगाच होईल,' असे आमिष दाखवून खरातने तिला आपल्या कार्यालयात विधीसाठी बोलावले होते. या विधीच्या बहाण्याने त्याने पीडितेवर लैंगिक अत्याचार केले. सुनावणीदरम्यान न्यायालयाने दोन्ही बाजू ऐकून घेतल्यानंतर खरातला १३ एप्रिलपर्यंत पाच दिवसांची पोलीस कोठडी दिली आहे.

## फायबर बोटींना मच्छीमारांची पसंती



**उरण : प्रतिनिधी**

पारंपरिक पद्धतीने मासेमारी करणाऱ्या मच्छीमारांनी आता आधुनिकतेची कास धरली आहे. त्यामुळे उरण परिसरातील करंजा, मोरा व इतर बंदरात मोठ्या प्रमाणावर फायबर बोटींची उभारण्यात येत असल्याचे चित्र दिसत आहे.

खोल समुद्रात मासेमारी करणाऱ्या लाकडी बोटी देखभालीसाठी अत्यंत खर्चिक ठरू लागल्या आहेत. या पारंपरिक बोटी बांधण्यासाठी बाभूळ व इतर लाकडांबरोबरच महागड्या सागवान लाकडाचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जात आहे. त्यासाठी मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या वृक्षतोडीमुळे जंगलाचा ऱ्हासही होत आहे. ९० टन क्षमता असलेली एक लाकडी बोट (ट्रॉलर) बांधण्यासाठी ७५-८० लाख रुपयांपर्यंत खर्च येतो. संपूर्ण खर्चाची रक्कम हाती असली तरी आवश्यक लाकडाची जमवाजमव करून साधारणतः लाकडी मच्छीमार बोट बांधण्यासाठी वर्षभराचा कालावधी लागतो. पैशांची अडचणींमुळे हा कालावधी अधिकच वाढतो.

लाकडी मच्छीमार बोटीच्या देखभालीसाठीही वर्षभरात ५० हजार ते एक लाखापर्यंत खर्च करावा लागतो. त्यामुळे प्रगतीकडे वाटचाल करणाऱ्या मच्छीमारांनी आता आधुनिकतेची कास धरली आहे. बहुतांश मच्छीमारांनी आता सर्वच बाबतीत मासेमारीसाठी फायदेशीर ठरणाऱ्या फायबर बोटींचा पर्याय निवडला असल्याचे करंजा मच्छीमार सहकारी संस्थेचे अध्यक्ष प्रदीप नाखवा यांनी माहिती देताना सांगितले.

# मत्स्यव्यवसायात महाराष्ट्र अव्वल करणार

## मत्स्यव्यवसाय व बंदरेमंत्री नितेश राणे यांचा कार्यशाळेत निर्धार

**मुंबई : प्रतिनिधी**

मत्स्यव्यवसायात राज्याला देशात अग्रस्थानी नेण्यासाठी राज्य शासनाने अनेक योजना, उपक्रम सुरू केले आहेत. या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणे तितकेच महत्त्वाचे आहे. या माध्यमातून मत्स्यव्यवसायात महाराष्ट्र नंबर वन करण्यात येईल, असे प्रतिपादन मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी केले.

मुख्यमंत्री मत्स्यसंपदा योजना, कृषी समकक्ष दर्जा व त्या अनुषंगाने सवलती आणि केंद्र शासनाच्या योजना अंमलबजावणीबाबत भा.कृ.अनु.प. (भारतीय कृषी अनुसंधान परिषद)- केंद्रीय मात्स्यिकी शिक्षण संस्था, वर्सोवा येथे आयोजित कार्यशाळेत मार्गदर्शन करताना ते बोलत होते. यावेळी विभागाचे सचिव डॉ. रामास्वामी एन., मत्स्यव्यवसाय, आयुक्त प्रेरणा देशभ्रतार, एमएफडीसी चे व्यवस्थापकीय संचालक प्रकाश खपले, केंद्रीय मात्स्यिकी शिक्षण संस्थेचे, संचालक डॉ.एम.शाहु आणि मत्स्यव्यवसाय विभागाचे जिल्हास्तरीय अधिकारी उपस्थित होते.




मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे म्हणाले, मत्स्यव्यवसायाला कृषीचा दर्जा देणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे. मत्स्यव्यवसाय क्षेत्राला चालना देण्यासाठी मुख्यमंत्री मत्स्यसंपदा योजनेस अन्य योजना राबविण्यात येत आहेत. या योजनांचा लाभ प्रत्यक्ष लाभार्थीस देऊन त्याला अधिक सक्षम करण्यासाठी अधिकाऱ्यांनी काम करावे. विभागाच्या योजनांची व्यापक प्रचार प्रसिद्धी करण्यासाठी जिल्हास्तरावर कॅम्प घेऊन जनजागृती करावी तसेच यासाठी सोशल मीडियाचा प्रभावी वापर करावा.

मत्स्यव्यवसाय विभागाच्या योजनांसाठी शासनाने मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून दिला असल्याचे सांगत, मत्स्यव्यवसाय मंत्री राणे म्हणाले, भविष्यात राज्याच्या मत्स्यव्यवसाय विभागाच्या योजनांचा अभ्यास अन्य राज्यांनी करावा यासाठी विभागातील सर्वच घटकांनी टीमवर्क म्हणून काम करावे. योजनांच्या अंमलबजावणीत उल्लेखनीय काम करणाऱ्यांचा गौरव केला जाईल. असे मंत्री राणे यांनी सांगितले.

मत्स्यव्यवसाय सचिव डॉ. एन. रामास्वामी म्हणाले, मत्स्यव्यवसायमध्ये उत्पादकता वाढवण्यासाठी राज्यस्तर व जिल्हा नियोजनमधून २८ योजना राबविण्यात येत आहेत. जिल्हास्तरावरील योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हा नियोजनमधून अधिकचा निधी अधिकाऱ्यांनी उपलब्ध करून घ्यावा. मत्स्यव्यवसाय विभागाच्या योजना क्लस्टर पद्धतीने राबविल्या जाणार असून या योजनांच्या माध्यमातून उत्पादकता वाढण्यास मदत होईल. विभागाच्या योजनांची लाभार्थी निवड देखील अधिकाऱ्यांनी मिशन मोडवर करावी.

मत्स्यव्यवसाय आयुक्त प्रेरणा देशभ्रतार म्हणाल्या, अर्थव्यवस्थेमध्ये मत्स्यव्यवसाय महत्त्वाचा भाग आहे. विभागाच्या योजनांची परिणामकारक अंमलबजावणी करून मत्स्यव्यवसायाला अधिक गती देण्यासाठी विभागाच्या योजना लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी पुढाकार घ्यावा, कार्यशाळेत मत्स्यव्यवसाय विभागाच्या योजनांच्या माहिती पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले.

# पेणमध्ये लाखो रुपयांचे जुने साहित्य ठेकेदाराकडून लंपास



**पेण : प्रतिनिधी**

हेटवणे कालवा हा हेटवणे धरण ते कांदळेपाडा ग्रामपंचायतीपर्यंत असून, या कालव्यातून मोठया प्रमाणात पाणी गळती होत असल्याने शासनाने नव्याने पूर्ण कालव्यामधून पाईपद्वारे शेतकऱ्यांना पाणी देण्याचे ठरविले असून, या वर्षी कालव्याला पाणी न सोडता पाईपलाईनचे काम युध्दपातळीवर सुरु आहे. परंतू, या कालव्यावरून मोठ्याप्रमाणात नागरिकांना ये-जा करण्यासाठी लोखंडी पूल बांधण्यात आले होते. साधरणतः एका पूलाचा विचार करता चार ते पाच हजार किलो वजनाचा लोखंडी पूल होता. अशा प्रकारचे साधारणतः चाळीस ते पन्नास पूल या कालव्यांवर बांधण्यात आले होते. मात्र ठेकेदाराने पाईपलाईनचे काम सुरु होताच आधिकाऱ्यांच्या आर्शिवादाने हे पूल काढून भंगारात विकल्याची धक्कादायक माहिती समोर येत आहे.

यामध्ये तीन ते चार लोखंडी पूल शिल्लक आहेत. महत्वाची बाब म्हणजे एखाद्या सरकारी प्रकल्पातील जुन्या वस्तू हया सरकार दरबारी रितसर जमा करून त्यांचा लिलाव करण्यात येतो. परंतू, या कालव्यांवरील हे पूल एका युवा राजकीय नेत्याला हाताशी धरून भंगारात विकण्यात आले आहेत. याबाबत या कामावर देखरेख करणारे अधिकारी अल्पेश पाटील यांच्याशी कार्यालयात जाऊन तीन वेळा संपर्क करण्याचा प्रयत्न केला, परंतू संपर्क झाला नाही. तसेच या कार्यालयाच्या प्रमुख कपले मॅडम यांच्याबरोबर देखील संपर्क करण्याचा प्रयत्न केला. परंतू त्यांनी हेतूपुरस्तर प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींना टाळले. त्या दरम्यात अल्पेश पाटील यांना भ्रमण ध्वनीवरून संपर्क झाल्यानंतर त्यांनी प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींना उडवा उडवीची उत्तर दिली आहेत. यावरून निश्चितच हे लोखंडी जूने पूल विकण्यामागे अधिकारी वर्गाचा हात तर नाही ना? असा ही संशय व्यक्त होत आहे.

तसेच स्थानिकांकडून मिळालेल्या माहितीनुसार सदरील अवजड पूल हे ठेकेदाराच्याच यंत्र सामुग्रीने काढण्यात आले असल्याचे समजते.

# खालापुरातील धामणी येथील कारखान्यात घुसून जीवे मारण्याची धमकी; पाच जणांवर गुन्हा दाखल

**खोपोली : प्रतिनिधी**

कारखान्यात सुरू असलेले विस्तारीकरणाचे कामात अडथळा निर्माण करून शिवीगाळ ,दमदाटी तसेच जीवे ठार मारण्याची धमकी देणाऱ्या धर्मेंद्र पिंगळे, यशवंत पिंगळे ,तानाजी पिंगळे, प्रदीप पिंगळे, मनोज पिंगळे सर्व रा. धामणी खालापूर यांच्याविरुद्ध खालापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वरील सर्व जण सात एप्रिल रोजी सकाळी साडेआठ वाजण्याच्या सुमारास




धामणी गावचे हद्दीतील आशापुरा अँग्रोकॉम प्रायव्हेट लिमिटेड कारखान्याच्या प्रवेशद्वारावर जमा झाले होते. कारखान्यातील सुरक्षा रक्षक, व्यवस्थापन अधिकारी, ठेकेदार व कामगार यांना शिवीगाळी दमदाटी करण्यात आली. तानाजी पिंगळे यांनी कारखान्याच्या मालकीच्या जागेत विना परवानगी बेकायदेशीरपणे प्रवेश करुन जेसीबी मशीन ऑपरेटर व डम्पर चालक यांना शिवीगाळी ,दमदाटी करुन चालु काम बंद केले. काम पुन्हा चालु केल्यास जिवे ठार मारण्याची धमकी दिली.

याप्रकरणी अक्षय लहू सांगडे याने खालापूर पोलीस ठाण्यात तक्रार दिली असून गुन्हा दाखल करण्यात आलाआहे. अधिक तपास पोलीस निरीक्षक सचिन पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार संदीप शेळके करत आहेत.

# बालविवाहप्रकरणी पतीसह चौघांवर गुन्हा दाखल

## पीडितेच्या प्रसुतीनंतर घटना उघडकीस

**खोपोली : प्रतिनिधी**

अल्पवयीन मुलीशी लग्न करून तिच्याशी वारंवार शारीरिक संबंध करून तिच्या प्रसूतीस कारणीभूत तिचा पती अनिल विष्णू वाघमारे वय २१ याचे विरुद्ध गुन्हा दाखल झाला असून बालविवाह लावून दिला म्हणून विष्णू पुत्या वाघमारे, गंगू विष्णू वाघमारे तिघे रा. परखंदे आदिवासी वाडी खालापूर आणि दिलीप शांताराम वाघमारे रा. अंतोरे आदिवासी वाडी पेण यांचे विरुद्ध खालापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. पिडित मुलगी अल्पवयीन असताना १७ जानेवारी २०२४ रोजी तिचे अनिल सोबत लग्न लावण्यात आले होते. पिडितेच्या प्रसूतीस कारणीभूत झाला म्हणून गुन्हा दाखल करण्यात आला.

# अकरा लाखांच्या भंगार मालाची ट्रकचालकांकडून परस्पर विल्हेवाट

**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर हद्दीतील एएमएनएस कारखान्यातून उचललेले भंगार इच्छित स्थळी न पोहोचवता ट्रक चालक बाबू कमीलाभाई भट्टी शेख आणि प्रदीप कुमार यांनी परस्पर अपहार केल्याची घटना घडली आहे.

फिर्यादी योगेश मस्के यांनी एएमएनएस कारखान्यातील भंगार वाहतूक करण्यासाठी दुर्गा ट्रान्सपोर्ट यांना भाडे दिले होते. दुर्गा ट्रान्सपोर्टचे दोन ट्रक कारखान्यात वाहतुकीसाठी पाठवण्यात आले होते. दोन ट्रकमध्ये मिळून दहा लाख ७२ हजार ९०० रुपये किंमतीचे २८ हजार ३१० किलोग्रॅम भंगार माल भरण्यात आला होता.

परंतु ट्रक चालक बाबू आणि प्रदीप यांनी तो माल न पोहचवता त्या भंगार मालाची परस्पर विक्री केल्याचा प्रकार उघडकीस आल्यानंतर योगेश मस्के यांनी खालापूर पोलीस ठाण्यात तक्रार देण्यात आली आहे

याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे .अधिक तपास खालापुर पोलीस निरीक्षक सचिन पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर बहु-संस्थात्मक आपत्ती सज्जता सराव



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कोणत्याही नैसर्गिक किंवा तांत्रिक आपत्तीचा सामना करण्यासाठी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ (NMIA) किती सज्ज आहे, याचे मूल्यमापन करण्यासाठी दोन दिवसीय भव्य 'बहु-संस्थात्मक आपत्ती सज्जता सराव' नुकताच यशस्वीरित्या पार पडला. 'राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण' (NDMA) आणि 'जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण' (DDMA) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या सरावात केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध यंत्रणांनी आपला सहभाग नोंदवून आपत्कालीन सज्जतेचे दर्शन घडविले.

विमानतळ परिसरात आयोजित या दोन दिवसीय कार्यक्रमाची सुरुवात 'टेबलटॉप सराव' या सत्राने झाली, ज्यामध्ये आपत्तीच्या वेळी करावयाचे नियोजन आणि विविध विभागांमधील समन्वयावर सविस्तर चर्चा करण्यात आली. यानंतर बचाव कार्यासाठी उपयुक्त ठरणारी अत्याधुनिक साधने आणि विशेष वाहनांचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. या सरावाचा मुख्य भाग म्हणजे 'पूर्ण-स्तरीय प्रात्यक्षिक सराव' होय. या माध्यमातून प्रत्यक्ष घटनेच्या वेळी दिला जाणारा प्रतिसाद, लोकांचे सुरक्षित स्थलांतर, शोध व बचाव कार्य, धोक्यांचे व्यवस्थापन आणि आपत्कालीन कृती केंद्रांचे (EOC) कार्यान्वयन या बाबींचे प्रत्यक्ष मैदानावर सूक्ष्म मूल्यमापन करण्यात आले.

या सरावासाठी एक अत्यंत गुंतागुंतीची आणि 'मल्टी-हॅजार्ड' परिस्थिती निर्माण करण्यात आली होती, ज्यामध्ये "चक्रीवादळ, आगीच्या घटना आणि धोकादायक किरणोत्सर्गी पदार्थांची गळती" अशा आव्हानांचा समावेश होता. या कठीण परिस्थितीत धोक्यांचे नियंत्रण करणे, आगीपासून बचाव, बहुमजली इमारतींमधून नागरिकांचे स्थलांतर करणे, संवाद यंत्रणेची कार्यक्षमता तपासणे, संसाधनांची जुळवाजुळव आणि प्रत्यक्ष घटनास्थळावरील सुरक्षा सुनिश्चित करणे, यांसारख्या कार्यपद्धतींची कठोर चाचणी घेण्यात आली.

दोन दिवस चाललेल्या या महत्त्वपूर्ण उपक्रमाच्या दुसऱ्या दिवशी डॉ.दिनेशकुमार अस्वाल आणि मेजर जनरल अजय वर्मा (NDMA) यांची प्रमुख उपस्थिती लाभली. या मोहिमेत केंद्र व राज्य शासनाचे विविध विभाग, 'राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल', सशस्त्र दले, 'केंद्रीय राखीव पोलीस दल' 'जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण' आणि 'अणुऊर्जा विभाग' यांतील अधिकाऱ्यांनी सक्रिय सहभाग घेतला.

# श्रीवर्धन आगारात 'लाल परी'साठी प्रवाशांची जोरदार हाक!



**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन आगारातून लांब पल्ल्याच्या मार्गांवर धावणाऱ्या तथाकथित 'आरामदायी' बसेस आता प्रवाशांच्या नाराजीचे कारण ठरत असून, पुन्हा एकदा पारंपरिक "लालपरी" म्हणजेच साध्या एसटी बसेस सुरू कराव्यात, अशी मागणी प्रवासी वर्गातून होत आहे.

श्रीवर्धन आगाराच्या स्थापने नंतर पुणे, मुंबई तसेच नालासोपारा, भाईंदर, बोरीवली या प्रमुख मार्गांवर साध्या बसेस नियमित धावत होत्या. कमी भाडे, साधेपणा आणि विश्वासार्ह सेवा यामुळे "लालपरी" प्रवाशांची पहिली पसंती होती. मात्र कालांतराने महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने (MSRTC) आधुनिकतेच्या नावाखाली शिवशाही (वातानुकूलित) आणि शयनयान बसेस सुरू केल्या. यामुळे साध्या बसेसचे प्रमाण कमी झाले आणि महागड्या बसेसचा वापर वाढू लागला.

परंतु, प्रत्यक्षात या आरामदायी बसेस प्रवाशांसाठी डोकेदुखी ठरत असल्याचे चित्र समोर येत आहे. वाढलेले तिकीट दर, अपुरी देखभाल आणि तांत्रिक बिघाड यामुळे प्रवासी नाराज झाले आहेत.

शिवशाही वातानुकूलित बस असूनही एसी यंत्रणा अनेकदा नीट कार्यरत नसते. उकाड्याच्या वातावरणात प्रवास करणे अत्यंत त्रासदायक ठरते. एसी सुरू केल्यावर येणारी दुर्गंधी, तुटलेली किंवा खराब झालेली आसने, अस्वच्छ पडदे आणि बंद अवस्थेतील मोबाईल चार्जिंग पॉईंट्स यामुळे प्रवाशांचा अनुभव अधिकच वाईट बनतो.

शयनयान बसेसमध्ये जागेची कमतरता ही मोठी समस्या ठरत आहे. बसमधील मार्ग अरुंद असल्याने गर्दीत ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना मोठा त्रास सहन करावा लागतो. बर्थवरील अस्वच्छ चादरी, उशा, दिशाहीन पंखे आणि खिडक्यांचा आवाज यामुळे प्रवास अस्वस्थ करणारा ठरतो. शिवाय, बर्थमध्ये बसण्यासाठीही पुरेशी उंची नसल्याने प्रवाशांना वाकून बसावे लागते.

महागडे तिकीट देऊनही अपेक्षित सुविधा मिळत नसल्याने प्रवासी संतप्त झाले आहेत. "कमी दरात साधा पण सुरक्षित आणि सोयीस्कर प्रवास हवा" अशी स्पष्ट भूमिका अनेक प्रवाशांनी मांडली आहे.या सर्व पार्श्वभूमीवर, लांब पल्ल्याच्या मार्गांसाठी पुन्हा साध्या बसेस सुरू कराव्यात, अशी मागणी जोर धरत आहे.

# जागतिक आरोग्य दिन उत्साहात साजरा




**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय अलिबाग येथील जनऔषध वैद्यकशास्त्र विभागाच्या वतीने वतीने जागतिक आरोग्य दिनानिमित्त (दि.७ एप्रिल ) रोजी जीएमसी अलिबाग कॅम्पसमध्ये सकाळी १०.०० वा.विशेष कार्यक्रम संपन्न झाला.

या कार्यक्रमासाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या अधिष्ठाता डॉ.पूर्वा पाटील या अध्यक्ष म्हणून उपस्थित होत्या. जन औषधवैद्यक शास्त्र विभागाचे प्रमुख डॉ.हराळकर,डॉ.नकाते, डॉ. बंटेवाड, डॉ.क्षीरसागर, डॉ.नाझिया उपस्थित होते यावर्षी जागतिक आरोग्य संघटनेची थीम Together for health, Stand with science अशी ठेवण्यात आली असून आरोग्याबाबत जानजागृती करण्यावर भर देण्यात आला होता.

या निमित्ताने विविध स्पर्धा उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये पोस्टर रचना स्पर्धा, रिल्स तयार करण्याची स्पर्धा, क्विझ स्पर्धा तसेच तज्ज्ञांचे मार्गदर्शनपर व्याख्यान यांचा समावेश होता. या कार्यक्रमाचा उद्देश आरोग्य व हक्काविषयी जनजागृती करणे, वैज्ञानिक दृष्टिकोन वाढवणे आणि विद्यार्थ्यांमध्ये सार्वजनिक आरोग्य विषयीची जाणीव निर्माण करणे हा होता. कार्यक्रमात विद्यार्थी, आरोग्य कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त सहभाग होता. "आरोग्यासाठी एकत्र या विज्ञानाला साथ द्या" हा संदेश देत आरोग्याबाबत जागरूक समाज घडविण्याचे आवाहन करण्यात आले.

पान १ वरुन

## आदिवासी विकासमंत्री डॉ. अशोक वुईके यांची पनवेलमधील कातकरी वस्तीला भेट

यानंतर पनवेल महापालिका मुख्यालयात आदिवासी, महसूल इत्यादी विभागांच्या अधिकाऱ्यांसमवेत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी संबंधित प्लॉटवरील कातकरी समाजाच्या मालकी हक्काबाबत चर्चा झाली असता महापालिकेकडून या विषयाबाबत सकारात्मक निर्णय घेऊ, असे महापौर नितीन पाटील यांच्याकडून सांगण्यात आले. आदिवासी बांधवांसाठी शबरी घरकुल योजनेंतर्गत ११६ प्रस्ताव आदिवासी विकास विभागास मनपाकडून सादर करण्यात आले असून विविध शासकीय योजनांचा लाभ सर्व पात्र आदिवासी बांधवांना पुढील तीन महिन्यांत मिळेल यासाठी प्रयत्न करू, असे आयुक्त मंगेश चितळे यांनी सांगितले. यावेळी पनवेल महापालिका क्षेत्रातील १६८० आदिवासी कुटुंबे आणि २० आदिवासी वस्त्यांचा आढावा घेण्यात आला.

आदिवासी बांधवांसाठी राबविण्यात येणाऱ्या पीएम जनमन योजना, राणी दुर्गावती योजना व विविध कल्याणकारी योजनांची पनवेलच्या शहरी भागातील अंमलबजावणीची व सध्यस्थितीची माहिती मंत्री डॉ अशोक वुईके यांनी आदिवासी विकास विभागाच्या अधिकाऱ्यांकडून घेऊन याबाबत सूचना दिल्या. शहरी भागातील आदिवासी समुदायकडे दुर्लक्ष होणार नाही, त्यांचे प्रश्न संवेदनशीलपणे सोडविले जातील तसेच त्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ मिळेल याची प्रशासनाने दक्षता घ्यावी, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

## मध्य रेल्वे कोकणासाठी चार वातानुकूलित विशेष रेल्वेसेवा चालवणार

**रोहा : प्रतिनिधी**

प्रवाशांच्या उन्हाळी हंगामातील वाढत्या गर्दीच्या पार्श्वभूमीवर मध्य रेल्वेने कोकण मार्गावर ४ वातानुकूलित विशेष सेवा चालविण्याचा निर्णय घेतला आहे. या गाड्या छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (CSMT) आणि मडगाव दरम्यान धावणार आहेत.

या गाडयांना दादर, ठाणे, पनवेल, पेण, रोहा, माणगाव, वीर, खेड, चिपळूण, सावर्डा, अरावली रोड, संगमेश्वर रोड, रत्नागिरी, आडवली, विलवडे, राजापूर रोड, वैभववाडी रोड, कणकवली, सिंधुदुर्ग, कुडाळ, सावंतवाडी रोड, थिवी आणि करमळी हे थांबे देण्यात आले आहेत.या गाडीची संरचना १८ वातानुकूलित ३- टायर इकॉनॉमी डबे व २ जनरेटर व्हॅन अशी असणार आहेगाडी क्र. ०११२९ साठी आरक्षण उपलब्ध आहे.

## घारापुरी बेटावर उत्खननात महाकाय साठवणूक जार आढळले

**उरण : वार्ताहर**

जागतिक वारसास्थळ असलेल्या घारापुरी (एलिफंटा) बेटावरील मोराबंदर येथे सुरू असलेल्या उत्खननात पुरातत्व विभागाला मोठे यश मिळाले आहे. भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, मुंबई मंडळ यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या या उत्खननात दोन प्रचंड आकाराचे साठवणूक जार आढळले असून यामुळे या बेटाच्या प्राचीन व्यापारी इतिहासातील एका नव्या अध्यायाचा उलगडा झाला.

मोराबंदर येथील उत्खनन सध्या सहा वेगवेगळ्या पॉकेट्समध्ये सुरू आहे. ताज्या माहितीनुसार एका विशिष्ट पॉकेटमध्ये मिळालेले अवशेष थक्क करणारे आहेत. उत्खननात दोन मोठे जार सापडले आहेत. त्यातील एकाची उंची १.२५ मीटर आहे, तर दुसऱ्या तुटलेल्या जारचा व्यास १.२२ मीटर इतका आहे. हे जार पाणी साठवण्यासाठी वापरले जात असावेत असा अंदाज आहे. येथे रोमन ॲम्फोरा, पश्चिम आशियातील टॉर्पेडो जार, चायनीज पोर्सिलेन आणि 'टर्क्वाइझ ग्लेझ वेअर'चे अवशेष सापडले आहेत. यावरून इसवी सन चौथ्या आणि पाचव्या शतकात या बंदराचा रोम आणि पश्चिम आशियाशी थेट व्यापार असल्याचे सिद्ध होते.

जार सापडलेल्या ठिकाणापासून ८० मीटर अंतरावर विटांनी बांधलेली आणि खडकात कोरलेली पाण्याची टाकी सापडली आहे. उत्खननात लोखंडी गोळे, दगडी नांगर तसेच कलचुरी आणि क्षत्रप काळातील नाणीही आढळली आहेत.

## दुखवटा

### वंदना कुरंगळे



**मोहोपाडा :** येथील वंदना नारायण कुरंगळे यांचे वयाच्या ७५व्या वर्षी आजारपणाने निधन झाले. त्यांना परिसरात ठकुबाई नावाने ओळखत. त्यांच्या पश्चात तीन मुले, दोन मुली, पाच नातवंडे असा परिवार आहे. त्यांचा दशक्रिया विधी रविवार दि.१२ एप्रिल रोजी श्री क्षेत्र गुळसुंदे येथे होणार असून उत्तरकार्य बुधवार दि.१५ एप्रिल रोजी राहत्या घरी मोहोपाडा येथे होणार आहेत

### सुरेश पाटील



**मुरुड :** तालुक्यातील ज्येष्ठ समाजसेवक सुरेशआप्पा शंकर पाटील (वय ७८) यांचे गुरुवारी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, तीन मुली, चार भाऊ, तीन बहिणी तसेच पुतणे-पुतण्या, भाचे-भाच्या, जावई, सुना असा ५० हून अधिक सदस्यांचा मोठा परिवार आहे. आमदार महेंद्र दळवी रायगड जिल्हा परिषदचे उपाध्यक्ष मधुकर पाटील तसेच मुरुड मधील विविध राजकीय पक्षातील लोकांनी उपस्थित राहुन त्यांना श्रद्धांजली अर्पण केली.

# किरकोळ वादातून एकावर प्राणघातक हल्ला

## कामोठ्यातील घटना; तरुण जखमी



**पनवेल : वार्ताहर**

किरकोळ वादातून थेट प्राणघातक हल्लचापर्यंत पोहचलेल्या धक्कादायक घटनेने कामोठे परिसरात खळबळ उडाली आहे. "ती"च्या सोबत का बोलतोस, या कारणावरून १७ वर्षीय युवकावर धारधार शस्त्राने हल्ला करण्यात आल्याची घटना समोर आली आहे.

जिगर पावणेकर असे जखमी झालेल्या युवकाचे नाव असून तो कामोठे परिसरातील रहिवासी आहे. या हल्ल्यात जिगर च्या पाठीवर आणि हातावर गंभीर जखमा झाल्या आहेत. जिगर पावणेकर (वय १७, रा. कामोठे) असे जखमी युवकाचे नाव आहे. कामोठे सेक्टर ३६ येथील झुडियो मॉल परिसरात ही घटना घडली. एका तरुणीने फोन करून बोलावल्याने जिगर कामोठे सेक्टर ३६ येथील झुडियो मॉलजवळ गेला होता. त्या वेळी त्या ठिकाणी ती तरुणी देखील उपस्थित होती.

दोघांचे बोलणे सुरू असताना त्या परिसरात उपस्थित असलेल्या काही अज्ञात युवकांनी स्वतःच्या जवळ असलेल्या धारधार शस्त्राने त्याच्यावर हल्ला चढवला. हल्लेखोरांनी धारदार शस्त्राने सपासप वार करत त्याला ठार मारण्याचा प्रयत्न केला, मात्र जिगरने घटना स्थानावरून पळ काढल्याने त्याचे प्राण वाचले. या हल्ल्यात त्याच्या पाठीवर आणि हातावर खोल जखमा झाल्याच्या अवस्थे मध्ये त्याला कामोठे मधील एका खाजगी रुग्णालयात उपचारा साठी दाखल करण्यात आले, त्यावेळी तो रक्तबंबाळ अवस्थेमध्ये होता.

तातडीने त्याच्यावर उपचार करण्यात आले या घटनेची माहिती स्थानिक कामोठे पोलिसांना मिळताच पोलिसाने घटनास्थळी पोहोचून जखमी जिगरची चौकशी केली आणि आणि हल्लेखोरांचा शोध सुरु केला आहे. हा हल्ला का झाला कोणी केला याचा शोध पोलिस घेत आहे.

# जल जीवन मिशन योजनेच्या कामांची आढावा बैठक



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

वावेघर जिल्हा परिषद सदस्या अनन्या अविनाश गाताडे व पंचायत समिती सदस्य राजु पाटील व अस्मिता अनंत पाटील यांच्या पुढाकाराने ९ एप्रिल २०२६ रोजी जल जीवन मिशन योजनेच्या कामांची आढावा बैठक ग्रुप ग्रामपंचायत पोसरीच्या कार्यालयात पनवेलच्या पाणीपुरवठा विभागाचे उप अभियंता विनोद माऊरे यांच्या उपस्थितीत घेण्यात आली.

या बैठकीस सर्व सन्माननीय सरपंच, उपसरपंच, सदस्य व लोकप्रतिनिधी उपस्थित होते. जल जीवन मिशन योजनेद्वारे ग्रामीण भागात नळाद्वारे पिण्याचे पाणी प्रत्येक घरापर्यंत पोहचवण्याच्या प्रगतीचा आढावा घेण्यात आला व कामात दिरंगाई करणाऱ्या ठेकेदारांवर कडक कारवाई करण्याच्या सुचना अनन्या गाताडे यांनी दिल्या.

# रसायनीत रस्त्यांवरील अतिक्रमणाविरुद्ध विशेष मोहीम

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी पोलीस ठाणे, ग्रुप ग्रामपंचायत वासांबे व ग्रुप ग्रामपंचायत चांभार्ली यांच्या संयुक्त विद्यमाने गावातील रस्त्यांवरील अतिक्रमणाविरुद्ध विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे.

दांड रसायनी रस्ता, बाजारपेठ परिसरात काही दुकानदारांनी आपल्या दुकानातील माल रस्त्यालगत असलेल्या गटारावर/नाल्यावर ठेवून अतिक्रमण केलेले आहे. त्यामुळे



वाहतुकीस अडथळा निर्माण होत असून पादचाऱ्यांना त्रास सहन करावा लागत आहे तसेच आपत्कालीन सेवांनाही अडचणी निर्माण होतात.


सर्व संबंधित दुकानदारांना सूचित करण्यात येते की, त्यांनी त्वरित स्वतःहून रस्त्यावरील गटारावर ठेवलेला माल काढून घ्यावा व अतिक्रमण दूर करावे. अन्यथा, ग्रामपंचायत व पोलीस प्रशासनाकडून संयुक्त कारवाई करून अतिक्रमण हटविण्यात येईल व संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल. ही मोहीम लवकरच राबविण्यात येणार असल्याचे रसायनी पोलीस स्टेशन तसेच ग्रामपंचायत विभाग यांनी दिली आहे. यासाठी सर्व नागरिक व दुकानदारांनी सहकार्य करावे, असे आवाहन होत आहे.

# कारवरील नियंत्रण सुटल्याने अपघात; चालक जखमी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

चार चाकी कार वरील नियंत्रण सुटल्याने गाडी रस्त्याच्या बाजूला जाऊन एका विद्युत पोलला धडकल्याची घटना ८ एप्रिल रोजी दुपारी साडेबाराच्या सुमारास घडली.

चार चाकी कार ८ एप्रिल रोजी एक महिला चालवत पनवेलच्या दिशेने जात होती.



यावेळी भोकरपाडा जवळ भरधाव वेगाने कार आली असता वळणावर चालकाचे कार वरील नियंत्रण सुटले आणि गाडी रस्त्याच्या खाली गेली. यावेळी ती एका विद्युत पोलला धडकली. गाडीतील एअरबॅग निघाल्या. त्यामुळे महिलेला थोडयाफार प्रमाणात दुखापत झाली. या अपघातात कोणतीही जीवित हानी झालेली नाही.

यावेळी महिलेला सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आले. या ठिकाणी नेहमीच अपघात होतात. येथील वळण धोकादायक आहे. त्यामुळे या ठिकाणी गतिरोधक उभारण्याची मागणी केली जात आहे. तसेच या ठिकाणी धोकादायक वळण आहे, अशा आशयाचे बॅनर लावणे गरजेचे आहे.

# नवीन पनवेलमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५व्या जयंतीनिमित्त सहा दिवसांचा भव्य भीमोत्सव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्ष नवीन पनवेल आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती नवीन पनवेल व आठ सामाजिक संस्था यांच्यावतीने दरवर्षीप्रमाणे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा सहा दिवसांचा जयंती भीमोत्सव १० एप्रिल ते १५ एप्रिलपर्यंत उत्साहात साजरा करण्यात येणार आहे.

शुक्रवार १० एप्रिल ते १३ एप्रिल दरम्यान मुलांसाठी चित्रकला स्पर्धा, विविध मैदानी खेळांच्या स्पर्धा, महिलांसाठी संगीत खुर्ची, खेळ पैठणीचा तसेच ज्येष्ठ माता-पित्यांचा सन्मान सोहळा इत्यादि स्पर्धात्मक आणि सन्माननीय कार्यक्रम तसेच मंगळवार दि. १४ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता धम्म ध्वजारोहण, १०.३० वाजता सुप्रसिध्द प्रवचनकार, भारतीय बौद्ध महासभेचे केंद्रीय शिक्षक आयु. कल्पेश कांबळे यांचे धम्म प्रवचन



आणि स्नेहभोजनाचा कार्यक्रम बुध्दगया प्रतिष्ठान अंतर्गत ॲड प्रकाश बिनेदार आम्रपाली बुध्द विहार, बिनेदार कॉर्नर जवळ, नवीन पनवेल. या ठिकाणी आयोजित केलेले आहेत.

तसेच मंगळवार दि. १४ एप्रिल रोजी सायंकाळी ०६ वाजता महाराष्ट्राचे ख्यातनाम गायक आनंद शिंदे (शिंदेशाही बाणा) यांचा भीमगीतांचा बहारदार कार्यक्रम आणि बुधवार दि. १५ एप्रिल रोजी सायंकाळी ०६ वाजता, महाराष्ट्राचे सुप्रसिध्द गायक जोडी साजन-विशाल यांचा भीमगीतांचा भरगच्च कार्यक्रम सिडको क्रिडांगण, बिनेदार मैदान, जय अंबे माता मंदिराशेजारी, सेक्टर २, नवीन पनवेल.(पूर्व) या ठिकाणी आयोजित केलेले आहेत. या भीमोत्सवाला सर्वांनी उपस्थित राहून सहकार्य करावे, असे आवाहन या कार्यक्रमांचे आयोजक व पनवेल महानगरपालिकेचे सभागृह नेता ॲड. प्रकाश बिनेदार यांनी केले आहे.



**पनवेल : शहरातील ठाणे नाका मार्गावरील द कॉर्पोरेट बिझनेस सेंटर येथे भूषण अजित पोवळे यांच्या साई पलक डेव्हलोपर्सच्या कार्यालयाचे महापौर नितीन पाटील यांच्या हस्ते उदघाटन झाले. यावेळी नगरसेवक सुमित झुंजारराव, शहर उपाध्यक्ष केदार भगत, उमेश इनामदार, शहर सरचिटणीस रूपेश नागवेकर, महेश सरदेसाई, अमित नाईक, नरेश माधव बापट आदी उपस्थित होते.**

# पनवेल मनपा स्थायी समितीच्या सभेत विविध विषयांना मंजुरी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा गुरुवारी (दि.९) आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहातील तिसऱ्या मजल्यावरील बैठक कक्षात स्थायी समिती सभापती बबन मुकादम यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. यावेळी विविध विषयांना मंजुरी देण्यात आली.

यावेळी स्थायी समितीचे सर्व सदस्य, परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, महापालिका सचिव नानासाहेब कामठे, उपायुक्त डॉ. वैभव विधाते, उपायुक्त प्रसेनजित कारलेकर, उपायुक्त स्वरूप खारगे, मुख्य लेखाधिकारी निलेश नलावडे, कार्यकारी अभियंता सुधीर साळुंखे, उपसचिव अक्षय कदम तसेच महापालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी पनवेल महानगरपालिका हद्दीतील सार्वजनिक ठिकाणी रंगरंगोटी व ग्राफिटी करण्याचा विषय मंजूर करताना कंत्राटदाराला २० टक्के रक्कम कपात करून रक्कम देण्याबाबत सभापतींनी सूचित केले.

पनवेल महानगरपालिकेतील संगणक, नेटवर्क आणि इतर



संगणकीय साहित्याचे कामकाज, निगा-दुरुस्ती व देखभाल करण्याच्या विषयास मंजूरी देण्यात आली. विविध विभागांच्या मागणीनुसार भाडेतत्वावर उपलब्ध करून घेणेत आलेल्या जागांना भाडेपट्टा मुदतवाढ देण्याच्या विषयावर चर्चा करण्यात आली. यामधील एकुण सात जागांपैकी आवश्यक चार जागांना भाडेपट्टा मुदतवाढ देण्यात आली.

पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'अ' प्र.क्र.१ कोयनावेळे व घोट या गावांना जोडणाऱ्या रस्त्यावरील तळोजा नदीवरील पुलाचे बांधकाम करण्याच्या विषयास स्थायी समितीने मंजूर दिली. पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती-अ, प्रभाग क्र-१ मधील करवले या गावाला पायाभूत सुविधा पुरविणेचे उर्वरित काम करण्याचा विषय सभेत मंजूर करण्यात आला.

अतिक्रमण, अनधिकृत बांधकाम निष्कासन करणेकामी अतिरीक्त १११ मनुष्यबळ उपलब्ध करुन घेणेकामी कार्यादेश निर्गमित करण्याच्या विषयावरती चर्चा करून सदरचा मंजूर करण्यात आला.

पनवेल मार्गाजवळ पनवेल महानगरपालिका हद्दीतील अंतिम भुखंड क्र.५०६, पनवेल बाजुने ते करंजाडे मलः निस्सारण उदंचन केंद्राजवळ गाढी नदीवर नवीन पुल बांधण्याच्या विषयास यावेळी सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

पनवेल महानगरपालिका हद्दीतील पोदी, सेक्टर-१६ नवीन पनवेल (पूर्व) येथील ना-दुरुस्त फुटपाथ दुरुस्त करण्याच्या विषयास सभापतींनी मंजूरी दिली. पनवेल महानगरपालिका हद्दीतील खारघर येथील प्रभाग समिती-अ, प्रभाग क्र.०४, मधील सेक्टर-१४, भुखंड क्र.१३ बी येथे प्राण्यांच्या अंत्यविधी करीता स्मशानभुमी विकसीत करण्याच्या विषयाची माहिती उपस्थित स्थायी समितीच्या सदस्यांना देण्यात आली. या विषयावर चर्चा करून हा विषय मंजूर करण्यात आला.

पनवेल महानगरपालिका हद्दीतील तळोजा सेक्टर-०७, प्लॉट नं.०६ येथे पनवेल महानगरपालिका शाळा बांधण्याचा विषयाची सर्व माहिती देण्यात आली. या विषयास स्थायी समितीने मंजूरी दिली. स्थायी समितीमध्ये सादर करत असलेल्या विषयांची माहिती पुढील सभेत पॉवर पॉईंट प्रेझेंनटेशनच्या माध्यमातून देण्यात यावी अशी मागणी यावेळी सदस्यांनी केली.

# दि रयत सेवक बँकेच्या वाशी शाखेकडून गुणवंतांचा सन्मान

**उरण : वार्ताहर**

दि रयत सेवक को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, सातारा यांच्या ८५ व्या वर्धापन दिनानिमित्त वाशी (नवी मुंबई) शाखेच्या वतीने कार्यक्षेत्रातील गुणवंत विद्यार्थी व सभासदांचा गुणगौरव समारंभ प. जो. म्हात्रे विद्यालय, नावडे येथे उत्साहात झाला.

रायगड विभागीय अधिकारी मोहन कोंगेरे यांनी विद्यार्थ्यांना भावी वाटचालीसाठी मार्गदर्शन केले व बँकेच्या उपक्रमाचे कौतुक केले. मॅनेजिंग कौन्सिल सदस्य डी. बी. पाटील यांनी बँकेच्या कार्याची माहिती दिली, तर माजी व्हाइस चेअरमन नुरा शेख यांनी बँकेच्या विविध योजनांचा लाभ सभासदांनी घ्यावा, असे आवाहन केले.

कार्यक्रमास मोठ्या संख्येने सभासद, विद्यार्थी व पालक उपस्थित होते. यावेळी इयत्ता ५ वी व ८ वी शिष्यवृत्ती परीक्षा, नवोदय प्रवेश परीक्षा, रयत प्रज्ञाशोध परीक्षा, NMMS व इतर स्पर्धा परीक्षा तसेच दहावी-बारावी बोर्ड परीक्षा व उच्च शिक्षणात यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र, ट्रॉफी व रोख रक्कम देऊन सन्मान करण्यात आला. तसेच राज्य शिक्षक पुरस्कार प्राप्त व NET/SET पात्र शिक्षकांचाही गौरव करण्यात आला.

रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य शैलेश म्हात्रे, नावडे स्थानिक स्कूल कमिटीचे चेअरमन एकनाथ पाटील, माजी चेअरमन पंढरीनाथ पाटील, आय.टी.आय.चे चेअरमन बाळाराम खुंटारकर, नावडे माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष मोहन गंधारकर, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर प्रमोद कोळी, रवींद्र भोईर सर, वीर वाजेकर कॉलेजचे प्राचार्य आमोद ठक्कर, फुंडे हायस्कूलचे प्राचार्य बबन साळुंखे तसेच दापोली हायस्कूलच्या प्राचार्या पुष्पलता ठाकूर आदी मान्यवर उपस्थित होते.



# सुक्या मासळीच्या मागणीत वाढ

## बेगमीची तयारी सुरू, दरवाढीचा फटका



**उरण : रामप्रहर वृत्त**

पावसाळयात खोल समुद्रातील व खाडीतील मासळीचे प्रमाण कमी होत असल्याने सुक्या मासळीचा वापर केला जातो. त्यामुळे अवघ्या दोन महिन्यांवर येऊन ठेपला असून सुक्या मासळीला मोठ्या प्रमाणात मागणी वाढली आहे. यामध्ये आंबार, बोंबील जवळा, कोळंबीचे सोडे याला अधिक पसंती दिली जात आहे, मात्र गेल्या काही महिन्यात मासळीची आवक घटल्याने सुक्या मासळीच्या दरात वाढ झाली आहे.

कोकणात किनारपट्टीवर रायगड जिल्ह्यातील गावांमध्ये आगरी कोळी समाजाचे वास्तव्य आहे. पावसाळ्यात खोल समुद्रातील मासेमारी बंद असल्याने हे गावकरी सुक्या मासळीची मोठ्या प्रमाणात साठवण करीत असतात. या बेगमीची तयारी सुरू झाली असून यासाठी उरण तालुक्यातील करंजा, खोपटे, केळवणे, दिघाटी परिसरात अनेक ठिकाणी मासळी सुकवताना दिसून येत आहे.

यामध्ये बोंबील, वाकट्या समवेत गावाजवळील रस्त्यावरदेखील लांबलचक पट्ट्यात जवळा उपलब्ध असल्याची माहिती उरण येथील स्थानिक गावकरी समीर कडू यांनी दिली आहे. रस्त्याच्या कडेला टोपल्या मांडून सुकी मासळी विकण्यात येत आहे. यात सुकी माखली, पापलेट, शिंगाली, बागडे, मांदेलीचा समावेश आहे.

तर जवळा, वाकट्या, कोलंबी सोडे, आंबार याला सर्वाधिक पसंती असल्याचे केळवणे येथील मासळी विक्रेती समीरा पाटील हिने सांगितले आहे. तसेच, सुके बोंबील, वाकट्या आणि कोलमाची वडी या भाजून खाण्याची चव अधिक असल्याचे मासळी विक्रेते घनश्याम पाटील यांनी सांगितले आहे.

**सगळ्यांच्याच पसंतीचा जवळा**

सुक्या मासळीतील कोलंबी सोडे हे सुमारे १८०० रुपये किलो दराने सर्वात महाग विकले जात आहेत. सर्वाधिक मागणी असलेला जवळा हा अवघ्या २०० रुपये दराने विकण्यात येत आहे. यामुळे, उरण तालुक्यातील अनेक खवय्ये हे सुक्या मासळीची साठवण करण्यासाठी गर्दी करताना होत आहे.



**पनवेल : तालुक्यातील येथील रायगड जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेला राज्यस्तरीय आदर्श शाळा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यानिमित्ताने मुख्याध्यापिका सुनिता साळवी यांच्यासह शिक्षक आणि शिक्षिकांचे सामाजिक कार्यकर्ते रवींद्र पाटील यांनी अभिनंदन केले.**

# नवीन पनवेलमध्ये घरफोडी

**पनवेल :** नवीन पनवेल सेक्टर १४ येथे राहणाऱ्या एका जीम ट्रेनरच्या घरी झालेल्या घरफोडीतून चोरट्यांनी चार लाख ३५ हजार रूपयांचे सोन्याचे दागिने व ५० हजारांची रोकड असा एकूण चार लाख ८५ हजार रूपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना घडली आहे. याबाबत जीम ट्रेनर असलेले गोविंदा पेरूमल यांनी दिलेल्या तक्रारीवरून खांदेश्वर पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

नवीन पनवेल सेक्टर १४ येथे राहणारे गोविंदा पेरूमल यांच्या रूमच्या दरवाजाची कडी कोयंडा तोडून चोरट्यांनी घरात प्रवेश केला व घरातील लोखंडी कपाटातील उपरोक्त ऐवज चोरून नेला. यात ५० हजारांची रोकड व चार लाख ३५ हजार रूपयांचे सोन्याचे दागिने यांचा समावेश आहे. याबाबत पोलीस अधिक तपास करत आहेत.

## संपादकीय

# 'कॉर्पोरेट' सुरक्षेवर प्रश्नचिन्ह

नाशिक शहरातील एका नामांकित बहुराष्ट्रीय कंपनीत महिलांवर विनयभंग, लैंगिक व मानसिक अत्याचार तसेच धार्मिक भावना दुखावल्याच्या गंभीर आरोपांनी उघड झालेले प्रकरण अत्यंत चिंताजनक आहे. २०२२ ते २०२६ या कालावधीत घडलेल्या या घटनांमुळे केवळ संबंधित कंपनीच नव्हे, तर संपूर्ण कॉर्पोरेट क्षेत्राच्या सुरक्षितता व नैतिकतेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. आतापर्यंत नऊ गुन्हे दाखल होऊन सहा संशयितांना अटक झाली आहे, तर दोन महिला संशयित फरार आहेत. या पार्श्वभूमीवर पोलीस आयुक्तांनी विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन करून या प्रकरणाच्या गांभीर्याची जाणीव दाखवून दिली आहे.

**या प्रकरणातील सर्वात धक्कादायक बाब म्हणजे, बहुराष्ट्रीय आणि तांत्रिकदृष्ट्या प्रगत मानल्या जाणाऱ्या कंपनीत अशा प्रकारचे गुन्हे दीर्घकाळ सुरू राहिले. आठ महिला आणि एका युवकाने केलेल्या तक्रारींवरून हे स्पष्ट होते की ही केवळ एक-दोन घटना नसून एक साखळी स्वरूपात घडलेली गंभीर बाब आहे. लग्नाचे आमिष दाखवून लैंगिक शोषण, मानसिक छळ आणि धर्मांतराचा प्रयत्न यांसारख्या आरोपांमुळे या प्रकरणाची व्याप्ती अधिकच वाढते. कॉर्पोरेट क्षेत्रात महिलांच्या सुरक्षिततेसाठी कठोर कायदे आणि नियमावली अस्तित्वात आहेत. विशेषतः 'पोश' कायद्यांतर्गत प्रत्येक संस्थेत अंतर्गत तक्रार निवारण समिती असणे बंधनकारक आहे, मात्र या प्रकरणातून असे दिसून येते की नियमांची अंमलबजावणी केवळ कागदोपत्री राहिली असावी. जर कंपनीमध्ये योग्य यंत्रणा प्रभावीपणे कार्यरत असती, तर इतक्या मोठ्या प्रमाणावर अत्याचार घडले नसते किंवा ते वेळेवर उघडकीस आले असते. या प्रकरणाच्या संदर्भात 'कॉर्पोरेट जिहाद' हा शब्दप्रयोग काही राजकीय व सामाजिक वर्तुळांतून पुढे येत आहे, मात्र गुन्हा हा गुन्हाच असतो. तपास यंत्रणांनी निष्पक्षपणे पुराव्यांच्या आधारे सत्य बाहेर आणणे हीच या क्षणाची खरी गरज आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी केली जाईल, असे आश्वासन दिले आहे. ही बाब स्वागतार्ह असली, तरी केवळ चौकशीपुरती मर्यादित न राहता दोषींना कठोर शिक्षा मिळणेही तितकेच आवश्यक आहे. अशा प्रकरणांत न्यायप्रक्रिया वेगवान आणि पारदर्शक असणे महत्त्वाचे ठरते, कारण पीडितांना न्याय मिळणे हेच समाजातील विश्वास पुनर्स्थापित करण्याचे साधन आहे. या घटनेमुळे कॉर्पोरेट क्षेत्रातील कामकाजाच्या पद्धतीवरही पुनर्विचार करण्याची गरज अधोरेखित होते. कंपन्यांनी केवळ आर्थिक प्रगतीकडे लक्ष न देता कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी आणि मानसिक आरोग्यासाठी ठोस उपाययोजना करणे आवश्यक आहे. नियमित प्रशिक्षण, संवेदनशीलता कार्यशाळा आणि तक्रारींचे त्वरित निवारण यावर भर दिला पाहिजे तसेच महिलांनी किंवा कोणत्याही पीडित व्यक्तीने पुढे येऊन तक्रार करण्यासाठी सुरक्षित वातावरण निर्माण करणे ही संस्थांची जबाबदारी आहे. अनेकदा भीती, सामाजिक दबाव किंवा नोकरी गमावण्याची शक्यता यामुळे तक्रारी दडपल्या जातात. या मानसिकतेत बदल घडवून आणणे अत्यंत गरजेचे आहे. पोलीस प्रशासनाने या प्रकरणात एसआयटी स्थापन करून योग्य पाऊल उचलले आहे. आता फरार संशयितांना लवकरात लवकर अटक करून संपूर्ण कटकारस्थान उघड करणे आवश्यक आहे तसेच या प्रकरणामागे आणखी कोणी सहभागी आहे का याचाही तपास होणे गरजेचे आहे. शेवटी नाशिकमधील ही घटना केवळ एका कंपनीपुरती मर्यादित नसून ती संपूर्ण समाजासाठी एक इशारा आहे. आधुनिकतेच्या आणि प्रगतीच्या आड दडलेल्या अशा विकृत प्रवृत्तीला वेळीच आळा घालणे आवश्यक आहे.**

# उन्हाळ्यातील पाणीटंचाईच्या झळा...





### खबरबात
प्रकाश सोनवडेकर

रायगड जिल्ह्यात दरवर्षी उन्हाळ्यात अनेक गावांना पाणीटंचाईला सामोर जावे लागते. भरपूर पाऊस पडून देखील टँकरने पाणीपुरवठा करावे लागते हे दुर्दैव आहे. यंदाही तीच परिस्थिती आहे. जिल्ह्यातील २८ धरणात ६८.२६१ दलघमी पाण्याच्या साठ्याची क्षमता आहे, मात्र सध्या या धरणांमध्ये २९.७७१ दलघमी म्हणजे केवळ ४३.४५ टक्के पाणी साठा शिल्लक राहीला आहे. चिंताजनक बाब म्हणजे यातील तीन धरणांमध्ये दहा टक्क्याहून कमी पाणीसाठा शिल्लक आहे. त्यामुळे या धरणांच्या पाणीसाठ्यांवर अवलंबून असलेल्या गावांमध्ये पाणीटंचाईचे संकट निर्माण झाले आहे.

रायगड जिल्ह्यात सन २०२५ मध्ये मे महिन्यापसूनच पाऊस सुरू झाला होता. जिल्ह्यात सरासरी ३ हजार मिलिमीटर पावसाची नोंद झाली. जिल्ह्यातील लधुपाटबंधारे विभागाची २८ धरणे शंभर टक्के भरली होती. त्यामुळे यंदाच्या उन्हाळ्यात मुबलक पाणीसाठा असले आणि पिण्याच्या पाण्याची टंचई जाणवरणार नाही असे वाटत होते. परंतु तसे झाले नाही.

जिल्ह्यात काही गावांमध्ये टॅकरव्दारे पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे. सध्या मार्च महिना सुरू आहे. तरी देखील २८ धरणात फक्त ४३.४५ टक्के जलसाठा शिल्लक राहिला आहे. तीन धरणात दहा टयांपेक्षा ही कमी जलसाठा शिल्लक राहिला आहे. धरणातील जलसाठा कमी झाल्याने पाणी पुरवठा कमी होत आहे. काही ठिकाणी एक दोन दिवस आड पाणी पुरवठा सुरू आहे. त्यामुळे नागरिकांना आतापासूनच पाण्याची चणचण सुरू झाली आहे. एप्रिल, मे महिन्यात शाळांना सुट्या सुरू होणार असल्याने चाकरमानी ही गावाकडे परतणार आहेत, मात्र त्यांना पाणी टंचाईचा सामना करावा लागणार आहे.

रायगड जिल्ह्यात लघु पाटबंधारे विभागाच्या अत्यारीत मुरुड (१), तळा (१), रोहा (१), पेण (१), अलिबाग (१), सुधागड (५), श्रीवर्धन (३), म्हसळा (२), महाड (४), कर्जत (२), खालापूर (३), पनवेल (३), उरण (१) या तेरा तालुक्यात २८ धरणे बांधली गेली आहेत. या धरणातून जिल्ह्यातील तसेच जिल्ह्यातील नागरिकांना पाणी पुरवठा केला जातो. जिल्ह्यातील २८ धरणात ६८.२६१ दलघमी पाण्याच्या साठ्याची क्षमता आहे. मात्र सध्या या धरणांमध्ये २९.७७१ दलघमी म्हणजे केवळ ४३.४५ टक्के पाणी. साठा शिल्लक राहीला आहे. चिंताजनक बाब म्हणजे यातील ३ धरणांमध्ये दहा टक्क्याहून कमी पाणी साठा शिल्लक आहे. त्यामुळे या धरणांच्या पाणी साठ्यांवर अवलंबून असलेल्या गावात पाण्याचे संकट निर्माण झाले आहे.

रायगड जिल्ह्यात सरासरी तीन हजार मिलिमीटर पावसाची नोंद होत असते. पण हे बहुतांश पाणी नद्यांवाटे समुद्राला जाऊन मिळते. पावसाळ्यात दुथडी भरून वाहणाऱ्या नद्या हिवाळ्यात कोरड्या पडण्यास सुरुवात होते उन्हाळ्यात अनेक ठिकाणी पाण्याचे दुर्भिक्ष निर्माण होते.गेल्या वर्षी रायगड जिल्हयात उत्तम पाऊस झाला होता. धरण भागात उत्तम पाऊस पडल्याने सर्व धरणे ही शंभर टक्के भरली होती. त्यामुळे जिल्ह्याचा पाणी प्रश्न गंभीर रूप धारण करेल असे वाटत नव्हते. परंतु मार्च महिन्यातच धरणातील पाणीपातळी कमालीची खाली गेली आहे. एप्रिल आणि मे महिन्यात पाण्याची पातळी अजून खाली जाणार आहे. त्यामुळे जिल्ह्यात पुढील काळात तीव्र पाणीटंचाई निर्माण होण्याची शक्यता आहे. पाणीटंचाई दूर करण्यासाठी प्रत्येक गावात पाणीपुरवठा योजना राबविण्यात आल्या आहेत. असे असूनही यातील काही गावांमध्ये टॅकरव्दारे पाणीपुरवठा केला जातो. केंद्र सरकार पुरस्कृत जल जीवन मिशन अंतर्गत रायगड जिल्ह्यात राबविण्यात येत आहे . रायगड जिल्ह्यात १५३० जलजीवन मिशनच्या योजना मंजूर आहेत. जल जीवन मिशनची सुरुवात १५ ऑगस्ट २०१९ रोजी झाली. केंद्र शासनाच्या जल जीवन मिशनचा मुख्य उद्देश २०२४ पर्यंत ग्रामीण भारतातील प्रत्येक घरात वैयक्तिक नळ कनेक्शनद्वारे स्वच्छ आणि पुरेसे पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे आहे. ग्रामीण भागातील प्रत्येक घरात वैयक्तिक नळ कनेक्शनद्वारे पाण्याची सोय करणे. प्रत्येक कुटुंबाला सुरक्षित आणि शुद्ध पिण्याचे पाणी पुरवणे. दररोज किमान ५५ . लिटर प्रति व्यक्ती या दराने पाण्याची उपलब्धता सुनिश्चित करणे.

ग्रे वॉटर व्यवस्थापन, जलसंधारण आणि पावसाच्या पाण्याची साठवण यांसारख्या उपाययोजनांद्वारे पाण्याच्या स्त्रोतांचे जतन करणे. पाण्याची व्यवस्थापन आणि देखभालीमध्ये समुदायाचा सक्रिय सहभाग घेणे. हा या योजनेचा उद्धेश आहे. यातील बहूतांश योजन रखडल्या आहेत. ज्या पूर्ण झाल्या आहेत त्यातून पाणीपुरवठा होत नाही, शेवटच्या वाडीपर्यंत पाणी का जात नाही. करोडो रुपये खर्च करून जनतेला पाणी मिळत नाही. नसले तर या योजनेचा पैसा पाण्यात गेला असेच म्हणावे लागेल या पाणीपुरवठा योजनेतील पाणी कुठ मुरतंय याचा शोध घेऊन कार्यवाही केली पाहिजे. अनेक योजना अश्या आहेत की टाकी बांधली, जलवाहिन्या टाकल्या परंतु पाणी नाही. ठेकेदाराला पैसे मिळाले. जनतेला पाणी मात्र मिळत नाही. असं का झालं? योजना का रखडल्या याची माहिती घ्यायला हावी. काही लोक मुद्दाम अडथळे आणतात. त्यांचा बंदोबस्त केला पाहिजे.

काही ठिकाणी चुकीची तांत्रिक मान्यता, चुकीचे इस्टीमेंट देण्यात आले आहे.त्यामुळे योजना अपूर्ण आहेत. गावांमध्ये जलवाहिन्या टाकण्यात आल्या आहेत. परंतु गावांमध्ये पाणी पोहचत नाही. पाणी पोहचत नाही म्हणून या योजनांच्या दुरूस्त्या करण्यात आल्या. त्यावर आजवर करोडो रूपये खर्च करण्यात आले. असे असताना ही लोकांना गावांमध्ये पाणी पोहचत नाही .

या गावातील महिलांना पाण्यासाठी ववणवण भटकावे लागतेय. पाणीपुरवठा योजना असूनही गावांमध्ये पाणी का पोहचत नाही ते शोधून ही समस्या दूर केली पाहिजे. गावांमध्ये जाणाऱ्या जलवाहिन्यांना खुंट्या मारल्या आहेत. त्यामुळे टोकाकडील वस्त्यांमध्ये पाणी जात नाही. या खुंट्या काढण्याचे धाडस प्रशासनाने दाखवले तरी बऱ्याच गावांना पिण्याचे पाणी मिळेल. कारवाई करण्याची इच्छाशक्ती हवी.




## रॉयल एनफील्ड हंटर ३५०चे नवीन व्हेरिएंट लॉन्च

रॉयल एनफील्डने आज (४ एप्रिल) आपली एंट्री लेव्हल रेट्रो स्टाइलची मोटरसायकल हंटर ३५० चे नवीन बेस प्रीमियम मॉडेल लॉन्च केले आहे. याची एक्स-शोरूम किंमत



₹१,४९,९०० ठेवण्यात आली आहे. कंपनीचा दावा आहे की, बाईकचे ARAI प्रमाणित मायलेज ३६.२kmpl आहे.

नवीन व्हेरिएंटला हंटर लाइनअपमधील सर्वात खालच्या 'फॅक्टरी ब्लॅक' व्हेरिएंटच्या वर ठेवण्यात आले आहे. नवीन मॉडेलचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे कमी किंमतीतही स्पोक व्हील्सऐवजी ट्यूबलेस टायरसह कास्ट अलॉय व्हील्स देण्यात आले आहेत.

डिझाइनबद्दल बोलायचं झाल्यास, नवीन मॉडेल 'टारमॅक ब्लॅक' ग्लॉस ब्लॅक पेंट स्कीमसह सादर करण्यात आले आहे. यात साइड पॅनलवर अत्यंत कमीत कमी रॉयल एनफिल्डची ब्रँडिंग दिली आहे, जे याला स्वच्छ आणि क्लासी लुक देते. यासोबत कंपनीने हंटरच्या टॉप व्हेरिएंटसाठी दोन नवीन आणि आकर्षक रंगांचे पर्यायही सादर केले आहेत. यात मुंबई यलो आणि मूनशॉट व्हाइट रंगांचा समावेश आहे.

वैशिष्ट्ये: रोटरी स्विचगियर आणि नवीन डिजिटल-ॲनालॉग क्लस्टर

बेस प्रीमियम व्हेरिएंटमध्ये कंपनीने फीचर्सच्या बाबतीत कोणतीही कपात केलेली नाही. यात टॉप व्हेरिएंटप्रमाणेच रोटरी स्विचगियर दिले आहेत. यासोबतच, यात नवीन डिजिटल-ॲनालॉग इन्स्ट्रुमेंट क्लस्टर आणि स्लिप-अँड-असिस्ट क्लचला स्टँडर्ड फिटमेंट म्हणून समाविष्ट केले आहे. सुरक्षेसाठी यात सिंगल चॅनल ABS सह समोर डिस्क ब्रेक आणि मागे ड्रम ब्रेक सेटअप मिळतो. हेडलाइटबद्दल बोलायचे झाल्यास यात २०२४ मॉडेलचा अपडेटेड राउंड हॅलोजन हेडलॅम्प दिला आहे. मात्र, यात ट्रिपर नेव्हिगेशनची सुविधा मिळणार नाही.

हंटर ३५० मध्ये फोर्क कव्हर गॅटर आणि एक ऑफसेट इन्स्ट्रुमेंट क्लस्टर पूर्वीप्रमाणेच मिळेल. हे इन्स्ट्रुमेंट क्लस्टर मीटिओर ३५० आणि स्क्रॅम ४११ प्रमाणेच आहे. बाईकचे स्विचगियर आणि ग्रिप देखील मिटिओरसारखेच दिसते. रोडस्टर बाईकमध्ये USB पोर्ट मिळतो, यामुळे रायडिंग करताना फोन देखील चार्ज करता येतो.कंपनीचा दावा आहे की, बाईक ११४kmph च्या टॉप स्पीडने धावू शकते आणि तिचे ARAI प्रमाणित मायलेज सुमारे ३६.२kmpl आहे.

# शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख



### निमित्त

डॉ. पंजाबराव देशमुख यांचा आज (१० एप्रिल १९६५) स्मृतिदिन. भारताचे पहिले कृषिमंत्री तसंच शिक्षणमहर्षी म्हणून त्यांची ओळख सर्वपरिचित आहे.पंजाबरावांनी १९५२ ते १९६२ या १० वर्षांच्या कालावधीत भारताचे कृषिमंत्री म्हणून काम पाहिलं.या काळात त्यांनी कृषी विभागाअंतर्गत अशा अनेक योजना सुरू केल्या ज्यामुळे कृषी क्षेत्राच्या विकासाला गती मिळाली.शेतीला विज्ञानाची जोड देऊन आधुनिक पद्धतीनं शेती करण्यास त्यांनी शेतकऱ्यांना प्रवृत्त केलं.

डॉ. पंजाबराव देशमुख यांचा जन्म २७ डिसेंबर १८९८ रोजी अमरावती जिल्ह्यातील पापळ या गावी झाला.पंजाबरावांचे यांचे वडील शामराव देशमुख हे शेती करत. त्यामुळेच बालपणापासून पंजाबरावांना शेतीविषयी प्रेम होतं.प्राथमिक शिक्षण गावात घेतल्यानंतर ते पुढे माध्यमिक शिक्षणसाठी अमरावतीला आले. महाविद्यालयीन शिक्षण त्यांनी पुण्याच्या 'फर्ग्युसन कॉलेज' इथून पूर्ण केलं.१९२१ मध्ये इंग्लंडच्या केंब्रीज विद्यापीठातून 'बॅरिस्टर पदवी' उत्तीर्ण केली. येथेच त्यांनी संस्कृतमध्ये एम.ए. आणि पी.एच.डी.ची पदवी घेतली.इंग्लंडमधील शिक्षणानंतर ते अमरावतीला परत आले. डॉ. पंजाबरावांच्या कारकिर्दीतली एक घटना अशी आहे, ज्यात त्यांनी घेतलेल्या निर्णयामुळे हजारो शेतकऱ्यांच्या जमिनी सावकाराच्या तावडीत जाण्यापासून वाचल्या.१९२० नंतर कापूस बाजारात मंदीची प्रचंड लाट आली. कापसाचा भाव २५० रुपयांवरून २५ रुपयांवर आला. त्यापूर्वीच्या १९१८ च्या दुष्काळाने शेतकरी आधीच संकटात सापडला होता.सावकार कोर्टात 'डिक्री' (कायदेशीर आदेश) मिळवून शेतकऱ्याच्या घरातील भांडीकुंडी, बैल, म्हशी जप्त करून त्रास देऊ लागले.या पार्श्वभूमीवर पंजाबरावांनी कर्ज लवाद बिल मांडले.या विधेयकाचे स्वरूप अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण होतं. खरं पाहिल तर हा शेतकरी वर्गाच्या कर्जमुक्तीचाच कायदा होता. अस्मानी, सुलतानी आणि सावकारी संकटांतून त्यांनी शेतकऱ्याला कायदेशीररीत्या मुक्त केले, अभयदान दिले.

पंजाबरावांनी १९२७ मध्ये मुंबईच्या सोनार जातीतील विमलाबाई वैद्य या तरुणीशी लग्न केलं. त्यामुळे विदर्भात विशेषतः मराठा समाजात खळबळ उडाली.विमलाबाई लग्नानंतर बी. ए. एलएल. बी. चं शिक्षण पूर्ण केलं. त्यांचा अनेक स्त्री संघटनांशी निकटचा संबंध होता. पुढे त्या राज्यसभेवरही निवडून आल्या. १९५५ साली पंजाबरावांनी 'भारत कृषक समाजा'ची स्थापन केली. या संस्थेमार्फत कृषीविषयक परिषदा, मेळावे आणि प्रदर्शनं भरवली. केंद्रीय कृषिमंत्री असताना डॉ. पंजाबरावांनी १९६० मध्ये दिल्ली येथे जागतिक कृषी प्रदर्शन भरविण्यात आले. अंदाजे १०० एकर जागेत हे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. हे कृषी प्रदर्शन भारताच्या कृषी क्रांतीच्या इतिहासातील मैलाचा दगड ठरले.

१९६५ मध्ये पंजाबरावांना पक्षाघाताचा झटका आला आणि दिल्ली येथे १० एप्रिल १९६५ रोजी त्यांचं हृदयविकारानं निधन झालं. त्यांच्या स्मरणार्थ अकोला इथं डॉ. पंजाबराव कृषी विद्यापीठ स्थापन करण्यात आलं. साभार : इंटरनेट

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

### घामाची दुर्गंधी दूर करण्याचे बेस्ट उपाय

उन्हाळा सुरू झाला की, घामामुळे लोक हैराण होतात. सोबतच घामाच्या दुर्गंधीमुळे त्यांना आणि इतरांनाही त्रास होते. अशात चार चौघात जाण्यासही भिती वाटते. त्यामुळे घामाच्या दुर्गंधीची समस्या दूर करण्यासाठी आम्ही काही घरगुती उपाय तुम्हाला सांगणार आहोत...

आधी जाणून घेऊया घामाच्या दुर्गंधीची कारणे. फार जास्त मसालेदार पदार्थ खाल्ल्यानेही शरीराची दुर्गंधी येऊ लागते. त्यामुळे उन्हाळ्यात जास्त मसालेदार पदार्थ खाणे टाळावेत. तणाव असल्यावर शरीरातून घाम



अधिक निघतो. यादरम्यान शरीरात कॉर्टिसोल हार्मोन अधिक रिलीज होतात.

ज्यामुळे असं होतं. जास्त प्रमाणात निघालेला घाम जेव्हा बॅक्टेरियाच्या संपर्कात येतो तेव्हा दुर्गंधी येऊ लागते. जर तुम्ही फार जास्त औषधे घेत असाल तर याचा प्रभाव तुमच्या शरीरावरही होतो. औषधांमधील रासायनिक तत्व शरीराच्या गंधाला प्रभावित करतात. अशात घाम आणि शरीराचा गंध मिळून दुर्गंधी निर्माण होते.

आंघोळीच्या पाण्यात काही थेंब गुलाबजल टाका. गुलाबजल एक नॅचरल कुलर आहे. यामुळे तुम्हाला फ्रेश वाटेल. तसेच तुम्ही घामाची दुर्गंधी दूर करण्यासाठी अंडरआर्ममध्ये बटाट्याच्या स्लाइसने रब करा. यानेही दुर्गंधी जाते. आंघोळीच्या पाण्यात थोडी तुरटी फिरवा किंवा पदीन्याची पाने बारीक करून टाका. यानेही घामाची दुर्गंधी दूर होण्यास मदत मिळते.

बेकिंग सोड्याचा तुम्ही टॅल्कम पावडरच्या रूपात वापर करू शकता. बेकिंग सोडा एक पाण्यात मिक्स करा आणि हे पाणी, काखेत, पायांच्या बोटांच्या मधे लावा. यासाठी एक कप पाण्यात दोन चमचे बेकिंग सोडा टाका. कपडे घालण्याआधी हे मिश्रण घाम येणाऱ्या भागांवर लावा.

पाणी उकडून घ्या आणि त्यात ग्रीन टी ची काही पाने टाका. हे पाणी थंड झालं तर कॉटनच्या मदतीने ते घाम येणाऱ्या भागात लावा. चहा त्वचा शुष्क आणि गंधमुक्त ठेवण्यास मदत करते. याचा वापर तुम्ही आठवड्यातून दोनदा करा. एक कप ताजा टोमॅटोचा रस घ्या आणि तो एकबकेट पाण्यात टाका. या पाण्याने आंघोळ करा. टोमॅटोमधील ॲंटीसेप्टीक गुण कोणत्याही प्रकारचा गंध निर्माण करणाऱ्या बॅक्टेरियाला नष्ट करण्यास मदत करतो.

# कर्जतमधील आदिवासी भागात टँकरने पाणीपुरवठा करण्याची मागणी



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्याच्या आदिवासी भागात पाणी टंचाई जाणवू लागली आहे. त्यामुळे आदिवासी भागातील लोकांना पिण्याचे पाणी आणण्यासाठी पायपीट करावी लागत आहे. आदिवासी समाज संघटनेच्या वतीने पाणीटंचाई स्थिती उद्भवलेल्या वाड्याना टँकरने पाणीपुरवठा करण्याची मागणी केली आहे.

आदिवासी समाज संघटनेच्या वतीने कर्जत तहसीलदार आणि पंचायत समितीकडे निवेदनाद्वारे मागणी करण्यात आली आहे.

कर्जत तालुका आदिवासी बहुल तालुका असून या तालुक्यात एप्रिल महिना सुरू झाल्यानंतर पाण्याचे दुर्भिक्ष्य निर्माण होते. आदिवासी भागातील पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी यासाठी नळपाणी योजना राबविल्या आहेत, मात्र अनेक नळपाणी योजन बंद स्थितीत आहेत तर नवीन पाणी पुरवठा योजनेची कामे अपूर्ण स्थितीत आहेत. त्यामुळे अशा आदिवासी वाडी वस्तीवर पिण्याच्या पाण्याचे अडचणी निर्माण झाल्या आहेत. मोग्रज विभाग, रेल्वे पट्टा, नेरळ विभाग, कशेळे विभाग, कळंब विभाग आदी भागात पिण्याच्या पाण्याची टंचाई असल्याचे नमूद केले आहे.

आदिवासी संघटनेने तालुक्यातील नळ पाणी योजनेची अपूर्ण असलेली कामे तातडीने पूर्ण करावी. बंद स्थितीत असलेल्या नळपाणी योजना सुरळीत कराव्यात तसेच पाणी टंचाई भागात तातडीने टँकरने पाणी पुरवठा सुरु करावा. बंद असलेल्या आणि अर्धवट असलेल्या नळपाणी योजनांची कामे जलदगतीने पूर्ण व्हावीत. अशी आदिवासी संघटनेने मागणी केली आहे.

पाणीटंचाई असलेल्या ठिकाणी टँकर पाणी पुरवठा करावा अन्यथा तीव्र आंदोलन केले जाईल तसेच कर्जत पंचायत समिती आणि तहसील कार्यालयावर हंडा मोर्चा काढला जाईल, असा इशारा निवेदनाद्वारे दिला आहे.

ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग कर्जत आणि कर्जत पंचायत समिती गटविकास अधिकारी सुशांत पाटील यांना आदिवासी समाज संघटनेच्या वतीने निवेदन आले.

यावेळी आदिवासी समाज संघटनेचे अध्यक्ष परशुराम दरवडा, कर्जत पंचायत समिती सदस्य अक्षय तिटकारे, महिला अध्यक्ष जयवंती हिंदोळा, सचिव भगवान भगत, विभागीय अध्यक्ष मनोहर ढुमणे, मोहन वारघडा, बबन शेंडे, काशिनाथ पादीर, लक्ष्मण उघडे, काशिनाथ उघडे, हिरू निरगुडा, ऋषी पुंजारा, परशुराम थोराड आदी उपस्थित होते.

## बहिणीच्या प्रियकराच्या खूनप्रकरणी आरोपीला जन्मठेपेची शिक्षा

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव पोलिस स्टेशनच्या हद्दीतील खरवली येथिल मयत विशाल उर्फ भिम श्रीपत जुमारे याचा सौरभ उर्फ बेंडया हरिश्चंद्र सावंत याने खुन केल्या बद्दल मा. अति. जिल्हा व सत्र न्यायाधीश एस.टी. भालेराव यांनी दि. ०९ एप्रिल २०२६ रोजी दोषी ठरवून आरोपीस भा.द.वि.क. ३०२ अन्वये जन्मठेप व रू. ३०००/- दंडाची शिक्षा सुनावली.

माणगाव पोलिस स्टेशनच्या हद्दीतील संत निरंकारी सत्संग भवनचे समोर ता. ११ ऑगस्ट २०१८ रोजी घडली. सदर घटनेची थोडक्यात हकीकत अशी की, आरोपी सौरभ उर्फ बेंडया हरिश्चंद्र सावंत याने मयत विशाल उर्फ बाळू उर्फ भिम श्रीपत जुमारे याचे व त्याच्या बहीणीचे प्रेमसंबंध होते. सदर प्रेमसंबंधाबाबत आरोपीत यास समजल्यामुळे आरोपी सौरभ सावंत खरवली, ता. माणगाव येथील संत निरंकारी हॉलमध्ये मयत विशाल जुमारे हा मित्रांसोबत बसलेला असतांना आरोपी सौरभ सावंत याने त्यास मारहाण करण्यास सुरूवात केली व सोबत आणलेला पॅण्टच्या खिशातील चाकू बाहेर काढून मयत विशाल याचे छातीचे डावे बाजूस खूपसून विशाल जुमारे यास ठार मारले.

या गुन्हयाचा तपास श्री एस.बी. गायकवाड, सहा. पोलिस निरीक्षक माणगाव पोलिस ठाणे यांनी करून न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले. सदर खटल्यामध्ये अति. शासकिय अभियोक्ता, जितेंद्र डी. म्हात्रे यांनी सरकार पक्षाच्या वतीने काम पाहिले.

**जाहीर नोटीस**

सर्व तमाम लोकांस जाहीर नोटीसीने असे कळविणेत येत आहे की, मौजे. महोदर , ता-पनवेल, जि-रायगड, येथील खाली वर्णन केलेल्या व्यक्तीच्या मालकी हक्काची, मिळकत वा जमीन ही आमचे आशिलांनी कायमस्वरूपी विकण्याचे ठरविले आहे. तरी, सदरहू मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर प्रसिध्द करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणे:

- मिळकतीचे वर्णन-

**मौजे : महोदर, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड**

| गाव | भोगवटादारांचे नाव | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे आर.पॉ. | आकाराणी रू.पै. |
|---|---|---|---|---|
| महोदर | श्री.एकनाथ चांगो देशेकर रा.मु. चिंध्रण, देवीचा पाडा ता. पनवेल, जि. रायगड | १०२/१ | ०.२०.२८ हे.आर.पॉ | ०.६८ |
| | | **एकूण** | **०. २०. २८** | |

सदरहू जागा, जामिन व मिळकतीसंबंधी अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षीस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती, अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार-मदार, हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तींना, इतर वारसांचा वा संबंधीतांना ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर, समक्ष तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे.

जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून आमचे आशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजीत व्यवहार पूर्ण करतील व विहीत मुदतीत न येणा-या कोणत्याही हरकती/तक्रारी आमचे अशिलावर बंधनकारक असणार नाहीत याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

**ठिकाण : पनवेल**
**दिनांक : ०९/०४/२०२६**

सही/-
**अॅड. सरिता महेंद्र साखरे**
पत्ता- बंन्सल असोसिअ्स, पहिला मजला प्लॉट नं.३०, सेक्टर १/२, रोड नं.४ नविन पनवेल, बालाजी मंदिरच्या समोर ता. पनवेल जि. रायगड. ४१०२०६.

## माणगाव येथील श्री दत्त मंदिराचा उद्या जत्रौत्सव

**माणगाव :** माणगावकरांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री दत्त मंदिराचा जत्रोत्सव शनिवार दि.११ एप्रिल रोजी मोठ्या उत्साहात संपन्न होणार असून या जत्रौत्सवात यात्रेकरूंनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन उत्सवाचा मनमुराद आनंद घ्यावा असे आवाहन जत्रौत्सव कमिटी माणगाव यांनी केले आहे. माणगाव येथील अॅड. केदार गांधी यांच्या निवासस्थानी रविवार दि.५ एप्रिल रोजी झालेल्या याबाबतच्या बैठकीला जत्रौत्सव कमिटीचे अध्यक्ष ज्ञानदेव पवार,अॅड.केदार गांधी,अमोल मोने,तेजस गांधी,काशीराम पोवार,गोविंद पोवार,खांदाड गावचे पोलीस पाटील नथुराम पोवार,आदी पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

## माणगाव तालुक्यात १६ ग्रामपंचायतींची पोटनिवडणूक

**माणगाव : प्रतिनिधी**

राज्यातील ग्रामपंचायतींतील सदस्य,थेट सरपंच यांच्या निधन,राजीनामा,अनहर्ता किंवा इतर अन्य कारणांमुळे रिक्त झालेल्या जागांच्या पोटनिवडणुकांसाठी पारंपारिक पद्धतीने राबविण्यात येणार निवडणूक कार्यक्रम राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केला आहे.

त्या अनुषंगाने राजकीयदृष्ट्या रायगड जिल्ह्यात महत्वपूर्ण अशा ओळखल्या जाणाऱ्या माणगाव तालुक्यातील १६ ग्रामपंचायतींचा पोटनिवडणूक कार्यक्रम निवडणूक आयोगाने जाहीर केला असून यासाठी मंगळवार दि.२८ एप्रिल २०२६ रोजी मतदान घेण्यात येणार आहे. याकरिता तालुक्यातील ग्रामीण भागातील विविध पक्षाचे पदाधिकारी,कार्यकर्ते यांची लगबग सुरु झाली आहे.

प्रो. जमा
अर्जदारातर्फे वकील श्री. नितेश भरत घोडविंदे

**जाहिर नोटीस**

**पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात**

दि.चौ. अर्ज नं. ३६१/२०२६
नि ९/ड
ने.ता. २९/०४/२०२६

कै. काना बाळया काथारा मयत तर्फे वारस
कै. रखमाबाई काना काथारा (मयत पत्नी)
१) श्री पद्माकर काना काथारा
वय ६०वर्षे, धंदा शेती
२) कै जानू काना काथारा मयत तर्फे वारस
२/१) श्री शोभा जानू काथारा
वय ५५ वर्षे, धंदा शेती
२/२) श्री गजानन जानू काथारा
वय ४८ वर्षे, धंदा शेती
२/३) श्री स्वप्नील जानू काथारा
वय ३५ वर्षे, धंदा शेती
१ ते २/३ रा नेवाली, ता पनवेल
जि- रायगड
२/४) सौ शब्दाली अतूल गोंधळी
वय २९ वर्षे, धंदा शेती
रा- खेरणे ता- पनवेल जि- रायगड
३) श्री चंद्रकांत काना काथारा
वय ५०वर्षे, धंदा शेती रा-नेवाली, ता पनवेल
जि- रायगड
४) श्रीमती माईबाई सुदाम भोईर
वय ६१ वर्षे, धंदा शेती रा. उंबार्ली,
ता. अंबरनाथ, जि. ठाणे.
— अर्जदार

तमाम जनतेस हया जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की.

१) कै काना बाळया काथारा हे १०/०२/२००६ रोजी मौजे नेवाली ता. पनवेल, जि. रायगड येथे मयत झालेले आहेत. तसेच कै काना बाळया काथारा यांची आई कै आनंदीबाई बाल्या काथारा ही दि ०४/०५/१९९६ रोजी मयत झाली आहे व त्यांची पत्नी कै. रखमाबाई काना काथारा ही दि २०/१२/१९८८ तसेच कै काना बाळया काथारा यांचा मुलगा कै जानू काना काथारा हे दिनांक ०६/०५/२०१७ रोजी मौजे नेवाली ता. पनवेल, जि. रायगड मयत झालेले आहेत. कै काना बाळया काथारा यांचा अर्जदार नं १ हा मुलगा असुन अर्जदार नं २/१ ही सून आहे व २/२ व २/३ हे नातु । असून २/४ ही नात आहे. व अर्जदार नं ३ हा मुलगा असून ४ ही मुलगी आहे. कै काना बाळया काथारा यांस वरील प्रमाणे वारसदार आहे.

२) कै काना बाळया काथारा यांचे नावे असलेल्या १२.१/२% योजने अंतर्गत शासनाने संपादित केलेल्या मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे आहे.

**जमिनीचे वर्णन**

| मौजे | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (ए.गु.पॉ) |
|---|---|---|---|
| आसुडगाव | ५९ | ४/प | ०-५०-६ |

श्री पद्माकर काना काथारा ... वगैरे हे के काना शल्या काथारा यांचे कायदेशीर वारसदार आहेत हया हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आंत घ्यावी मे. कोर्टात प्रत्यक्ष अथवा वकीलामार्फत हजर होऊन हरकती घ्याव्यात जर हया काळावधीमध्ये योग्य त्या हरकती न आल्यास हे मे. कोर्ट श्री पद्माकर काना काथारा ... वगैरे हयांच्या हक्काबद्दल पूरावा घेणेची कार्यवाही करेल व ते जर कै काना बाळया काथारा यांचे वारसदार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि. ०९/०४/२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानीशी दिली.

**सही/-**
**क. लिपिक**
**दि.न्या. क. स्तर**
**पनवेल**

शिक्का

**सही/-**
**सहा. अधिशक**
**दि.न्या. क. स्तर**
**पनवेल**

**PUBLIC NOTICE**

Notice is hereby given to the public at large that my clients **ANAAHAT ENTERPRISE through its Partner 1) Ms. Leena Haritsinh Gohil & 2) Mr. Mukesh Karman Arethia,** registered office address Plot No. 33, Sector 2, Ulwe, Navi Mumbai., has purchased 499.84 Sq.mtrs. of plot bearing no. Plot No. 60, Sector 54, Dronagiri Node, from **M/S Dev Enterprise through Proprietor Mr. Bhanaji Deva Bera,**

***SCHEDULE OF PLOT***

| Node Name | Plot No. | Sector No. | Area |
|---|---|---|---|
| Dronagiri | 60 | 54 | 499.84 Sq.mtrs. |

Any person/s having any claim against or to the said Plot by way of sale, Mortgage, Charge, Gift, Lease, Easement, Use, Trust, Possession, Inheritance, Lien or otherwise however it is hereby required to make the same known to the undersigned at his office address given herein above within the period of 7 days from the date of publication hereof otherwise the transaction / sale will be completed without reference to such claims and the same if any will be considered as waived.

***Date 09.04.2026***
***Place - Panvel***

**sd/-**
**Mr. Pankaj V. Mandhare**
**Advocate**

*Flat No 1107, 11 Floor, Building No. 12, Ananta Tower, Plot No 2, Sector 6, Ulwe, Panvel 410206 Mob. 9702416111 adv.pankajmandhare@gmail.com*

**जाहिर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळवीणेत येते की मौजे लोणिवली, तहसील- पनवेल, जिल्हा रायगड, येथील खाली वर्णन करणेत आलेली शेतजमीन विद्यमान कब्जेदार यांचेकडून आमचे अशिलानी कायम खरेदी घेणेचा व्यवहार ठरविला आहे, महसूल दप्तरी असलेले सदर शेतजमीनीचे वर्णन खालिलप्रमाणे:-

**शेतजमीनीचे वर्णन**

मौजे लोणीवली, तहसील पनवेल जिल्हा रायगड येथील मे. दुय्यम निबंधक पनवेल यांचे अधीकार क्षेत्रातील.

| गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र | | | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| | लावणी लायक हे.आर.प्रती | पोटखराबा हे.आर.प्रती | एकुण क्षेत्र हे.आर.प्रती | |
| १२८/८ | ०-०२-०० | ०-०२-०० | ०-०४-०० | ००.०९ |

वरील शेतजमीन / मिळकत या बाबत अन्य कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, पोटगी, वारसा वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्या सहीत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन १५ दिवसाचे आत पोहचतील अश्या खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालक यांच्या बरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : ०९/०४/२०२६

**सही/-**
**अॅड. स्वप्निल व्यं. जाधव**
बी.ए., एल. एल. बी.

**कार्यालयीन पत्ता** - शॉप नं. १५४, पनवेल महानगरपालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स, दत्त झेरॉक्सच्यावर, ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६
संपर्क : ८८८८२७१७५९

## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

ई निविदा सूचना क्रमांक ०२/२०२६-२०२७ (मुंबई)

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | तळोजा **पाणीपुरवठा योजनेची देखभाल** व **दुरूस्ती**...... तळोजा औद्योगिक क्षेत्र व तळोजा फीडर रस्त्यामधील रस्त्यालगतचे, मोकळे भूखंड/जागा, राखीव भूखंड आणि सुविधा भूखंडांवरील अतिक्रमण हटवणे. | ₹ १९,११,०१०.०० |
| २ | निवळी **पाणीपुरवठा योजनेची** देखभाल व **दुरूस्ती**.... निवळी जलशुद्धीकरण केंद्रातील सीएलएफ पुलाची दुरुस्ती व बळकटीकरण करणे, **फ्लॅश मिक्सर बदलणे** व अनुषंगिक कामे करणे. | ₹ ३९,५७,५००.०० |
| ३ | तळोजा **येथील सांडपाणी निःसारण योजनेच्या टप्पा** क्र.१ ची देखभाल व दुरूस्ती... तळोजा येथील सांडपाणी निःसारण योजनेच्या टप्पा क्र.१ मधील उदंचन गृहातील ३ मेट्रिक टन क्षमतेची ईओटी क्रेन बदलणे व अनुषंगिक कामे करणे. | ₹ ३८,७०,४५८.०० |
| ४ | रानसई पाणीपुरवठा योजनेची देखभाल व **दुरुस्ती**... रानसई धरणावरील अशुद्ध जलवाहिनीवर इनलाइन एअरेशन सिस्टीमचा पुरवठा करणे, बसविणे व चाचणी घेऊन कार्यान्वित करणे. | ₹ ३९,९५,०८९.०० |
| ५ | **पाताळगंगा येथील नवीन पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती**... पाताळगंगा येथील नवीन पाणीपुरवठा योजनेच्या फिल्टर बेड क्र. ४ **ची दुरुस्ती** व बळकटीकरण करणे. | ₹ ३९,७४,२७०.०० |
| ६ | तळोजा व टीटीसी औद्योगिक क्षेत्रातील **सांडपाणी निःसारण योजनेची देखभाल व दुरूस्ती**..... तळोजा टप्पा १ व २, ऐरोली सांडपाणी उदंचन केंद्रातील विविध ठिकाणी बसविलेल्या पंपांची वार्षिक तत्वावर देखभाल व दुरुस्ती करणे. **(दुसरी मागणी)** | ₹ २७,४७,१५९.०० |

उपरोक्त अ.क्र. १ ते ५ वरील **कामांबाबत** निविदा प्रपत्र दिनांक १०/०४/२०२६ ते दिनांक २४/०४/२०२६ **पर्यंत** व अ.क्र. ६ वरील कामाबाबत निविदा प्रपत्र दिनांक १०/०४/२०२६ ते दिनांक २०/०४/२०२६ पर्यंत https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी **वरील कामांबाबत दिनांक** १३/०४/२०२६ पूर्वी त्यांचे प्रश्न वर नमुद संकेत स्थळावर **नोंदवावेत**. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा **दिनांक** १५/०४/२०२६ पासून वर नमुद संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

**पनवेल येथील दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर पनवेल**

दि. चौ. अर्ज क्र ४८/२०२६
नि ७/ड
ने. ता. २४/०४/२०२६

१) **श्रीमती. प्रभावती हरिंशचंद्र यादव, (पत्नी)**
वय ५६ वर्षे, व्यवसाय - गृहीणी
राहणारः- निंलबारी को.ऑ हौ. सोसायटी,
बी३०१:, सुकापूर, ता. पनवेल, जि. रायगड.
२) **श्री, संतोश हरिंशचंद्र यादव, (मुलगा)**
वय ४५ वर्षे, व्यवसाय
राहणारः- स्वागत को.ऑ हौ. सोसायटी, १०२,
सुकापूर, ता. पनवेल, जि. रायगड.
३) **श्री, संदीप हरिंशचंद्र यादव, (मुलगा)**
वय ४२ वर्षे, व्यवसाय
राहणारः- निंलबारी को.ऑ हौ. सोसायटी,
बी ३०१:, सुकापूर, ता. पनवेल, जि. रायगड.
— अर्जदार

**विरूध्द**
कोणीही नाही

**जाहीर नोटीस**

आम्ही अर्जदार **श्रीमती. प्रभावती हरिंशचंद्र यादव, वय ६६ वर्षे**, **व्यवसाय गृहीणी, या कै. हरिशचंद्र विठोबा यादव (तुपे), यांच्या पत्नी आहे. अर्जदार २) श्री, संतोष हरिंशचंद्र यादव, वय ४५ वर्ष, अर्जदार३) श्री, संदीप हरिंशचंद्र यादव, वय ४२ वर्ष, हे कै. हरिशचंद्र विठोबा यादव (तुपे), यांच्या मुलगे आहे राहणार निंलबारी को.ऑ हौ. सोसायटी, बी३०१:, सुकापूर, ता. पनवेल, जि. रायगड.. सर्व राहणार निंलबारी को.ऑ हौ. सोसायटी, बी३०१:, सुकापूर, ता. पनवेल, जि. रायगड..** हे सर्व हया पत्यावर राहत आहे.

मयत **कै. हरिंशचंद्र विठोबा यादव**, यांचे पनवेल या ठिकाणी दि. ०२/०८/२००६, रोजी येथे राहत्या घरी निधन झाले. मयत **कै. हरिंशचंद्र विठोबा यादव**, यांच्या निधनाची नोंद पालीदेवद ग्रामपंचायत, येथे केलेली आहे. यांच्या अधिकाऱ्याची सही व शिक्का आहे. यांनी त्यांच्या मृत्युचा दाखला दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| अ.क्र. | पत्ता | किंमत |
|---|---|---|
| १) | रूम नं. १०२, पहीला मजला, स्वागत को.ऑ हौ. सोसायटी, बिल्डींग न. ६, प्लॉट नं./ सर्व्हे न.८/१बी (२), गाव - पाली देवद, ता. पनवेल, जि. रायगड. क्षेत्र. ५९५ स्वै. फू. | रू. १,३७,५००/- |
| २) | गाळा नं. ५, तळमजला, कार्तिकेय गार्डन, सर्व्हे न. ९९२(१) (१) गाव - पाली देवद, ता. पनवेल, जि. रायगड. क्षेत्र. १७२ स्वै. फू | रू. १,८९,५००/- |

वरील मिळकतीबाबत उक्त अर्जदारांनी वारस दाखला मिळण्याकरीता अर्ज दिला आहे. यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारसदार नव्हे असे कोणास समजाविण्याचे असेल आणि वरील मिळकतीच्या वारस दाखल्याबाबत कोणाचे हक्क, अधिकार अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तकार वगैरे असल्यास त्याने तशी लेखी हरकत हा जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आंत या मे. कोर्टात सादर करावी. दिलेल्या मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास या अर्जदारास यांचे विनंती प्रमाणे वारस दाखला दिला जाईल व त्यांनतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि. ०८/०४/२६ रोजी माझ्या सहीने व में. कोर्टाचे शिक्यानिशी दिली.

**सही/-**
**क. लिपिक**
**दि.न्या. क. स्तर**
**पनवेल - रायगड**

शिक्का

**सही/-**
**सहा. अधिशक**
**दि.न्या. क. स्तर**
**पनवेल - रायगड**

# जेएनपीए-उरणला जोडणाऱ्या महामार्गांचे पथदिवे बंद

## अपघाताचा मोठा धोका



**उरण : रामप्रहर वृत्त**

अवजड वाहतुकीसाठी महत्त्वाचा असलेला व जेएनपीटी बंदराला जोडणारा जेएनपीटी ते पळस्पे व जेएनपीए ते आम्र मार्ग आठवडाभरापासून अंधारात आहे. या दोन्ही राष्ट्रीय महामार्गांवरील सर्वच्या सर्व पथदिवे बंद असल्याने अपघाताचा मोठा धोका आहे. यामुळे वाहनचालकांकडून वाहन चालवताना खबरदारी घेण्यात येत असून वाहतुकीचा वेगही मंदावला आहे.

दोन्ही राष्ट्रीय महामार्ग भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण(एनएचआय) ने उभारले आहेत. त्यामुळे या मार्गाची देखभाल दुरुस्तीची जबाबदारी ही याच विभागाची आहे. मात्र या महामार्गावर होणाऱ्या अंधाराकडे वारंवार दुर्लक्ष होत आहे. या मार्गाचे काम करणाऱ्या कंत्राटदारांचा देखभाल दुरुस्तीचा कालावधी संपला आहे. त्यामुळे आणखी काही दिवस उरणच्या नागरिकांना अंधारातच प्रवास करावा लागणार आहे. येथे ठिकठिकाणी खड्डे पडले असून उड्डाणपुलाचे कामही सुरू आहे. यामुळे या मार्गावरून वेगाने धावणाऱ्या जड व प्रवासी वाहनांना अपघाताचा धोका आहे. त्यामुळे भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने येथील पथदिवे तत्काळ दुरुस्त करावे, अशी मागणी वाहनचालक व नागरिकांनी केली आहे.

उरण ते नवी मुंबई तसेच पनवेल व पुणे या मुख्य शहराना जोडणाऱ्या या राष्ट्रीय महामार्गाच्या उभारणीमुळे येथील प्रवास सुखकर झाला आहे. त्यामुळे या मार्गावरील वाहनांचा वेग अधिकचा असतो. या वेगामुळे अपघात होण्याची शक्यता वाढली आहे. यात दुचाकीस्वारांचे अपघात वाढले आहेत.

सिडकोच्या द्रोणागिरी ते पागोटे या सागरी महामार्गावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहेत. या मार्गाची दुरुस्ती मे २०२४ मध्ये करण्यात आले आहे, मात्र अवघ्या काही महिन्यांतच हा मार्ग नादुरुस्त झाला आहे. यात जड कंटेनर वाहनांची संख्या जास्त असल्याने धोकादायक बनले आहेत. या मार्गावरील खडी उखडल्याने दुचाकीवरून प्रवास करणे कठीण होत आहे.

> **महामार्गाचे काम करणाऱ्या कंत्राटदारांचा कालावधी संपुष्टात आला आहे. त्यामुळे एनएचआयकडून महामार्गाच्या देखभाल दुरूस्तीसाठी निविदा मागविण्यात आल्या आहेत. १० एप्रिलला ही निविदा जाहीर होणार आहे. त्यानंतर महामार्गावरील पथदिवे सुरू होतील.**
> **–धीरज शहा,** अभियंता,
> भारतीय रस्ते विकास प्राधिकरण

जेएनपीटी ते पळस्पे या राष्ट्रीय महामार्गाला हा सागरी महामार्ग जोडण्यात आला आहे. त्यामुळे जेएनपीटी बंदरातून खोपटे आणि उरणच्या पूर्व विभागातील अनेक गोदामात ये–जा करणाऱ्या हजारो जड कंटेनर वाहनांमुळे हा मार्ग सतत वर्दळीला बनला आहे. त्याचप्रमाणे या मार्गावरून उरण, द्रोणागिरी नोड, खारपाडा किंवा अलिबागला जाणारी लहान प्रवासी वाहनेही याच मार्गाचा वापर करीत आहेत. त्यामुळे जड व प्रवासी वाहनांसाठी हे अपघाताचे ठिकाण बनले आहे.

# वानिवलीत इलेक्ट्रिक शेगडीचे वाटप

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी पाताळगंगा औद्योगिक परिसरातील वानिवली गावातील १२० घरातील महिलांना इलेक्ट्रिक इन्फ्रारेड इंडक्शनचे वाटप करण्यात आल्याने महिलांवर्गात आनंदाचे वातावरण दिसून येत आहे.

इराण अमेरिका युध्दाचा परिणाम गॅस पुरवठ्यावर झाल्याने रसायनी परिसरात अपुरा पुरवठ्यामुळे गृहिणींना स्वयंपाक करताना अडचणी येत आहेत. यासाठी वडगाव वाशिवली गावाजवळ असणाऱ्या फ्रिनस्टर प्रायव्हेट लिमिटेड कंपनीचे सर्वेसर्वा विशेष अगरवाल यांच्या सहकार्याने सिएसआर फंडातून स्वयंपाकाच्या गॅसचा पुरवठा अपूरा असलेल्या वानिवली गावासाठी इलेक्ट्रिक इन्फ्रारेड इंडक्शनचे गावातील १२० महिला कुटुंबांना वाटप करण्यात आले.

यावेळी व्यासपीठावर कंपनी युनिट हेड जितेंद्र तिवारी,प्लंट हेड तुषार तळेकर, अक्षय यादव, मेंटेनन्स हेड कौशिक पाल,एचआर हेड अनिल जांभळे, माजी सरपंच सुनील थोरवे आदींसह मान्यवर उपस्थित होते. गॅसच्या अपुऱ्या पुरवठ्यामुळे वानिवलीत गृहिंणींना स्वयंपाक करणे कठीण झाले होते, यातच इलेक्ट्रिक इन्फ्रारेड इंडक्शन शेगडी मिळाल्याने महिलांनी फिनस्टार ब्लॅक प्रायव्हेट लिमिटेड कंपनीचे आभार मानले.

दरम्यान, फिनस्टार ब्लॅक प्रायव्हेट लिमिटेड कंपनीकडून परिसरातील शालेय विद्यार्थ्यांना शालोपयोगी साहित्य वाटप, पर्यावरण संतुलन राखण्यासाठी कापडी पिशव्यांचे वाटप, परिसरातील शाळांना कपाट तसेच शैक्षणिक साहित्य वाटप आदी उपक्रम सुरूच आहेत.



# उद्या झोपडपट्टी पुनर्वसन कार्यशाळा

**नवी मुंबई : प्रतिनिधी, बातमीदार**

ठाणे–बेलापूर पट्टीमध्ये सुमारे ४२ हजार झोपडीधारक आहेत. नवी मुंबई शहरातील या घटकाला लवकरच कायमस्वरूपी हक्काची घर मिळणार आहेत. त्या अनुषंगाने झोपडपट्टी पुनर्वसनविषयक विविध प्रश्न, धोरणे आणि उपाययोजना यावर सखोल चर्चा व मार्गदर्शन करण्यासाठी ११ एप्रिल २०२६ रोजी सांयकाळी ६ वाजता. सीबीडी सेक्टर १ येथील सुनिल गावस्कर मैदान येथे विशेष कार्यशाळेचे आयोजन बेलापूरच्या आमदार मंदा म्हात्रे यांच्या पुढाकाराने करण्यात आले आहे.

या कार्यशाळेमध्ये झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पांशी संबंधित शासकीय अधिकारी, तज्ञ, स्थानिक लोकप्रतिनिधी तसेच स्थानिक नागरिक सहभागी होणार आहेत. झोपडपट्टी पुनर्वसन प्रक्रियेमध्ये येणाऱ्या अडचणी, प्रलंबित प्रश्न, तसेच नागरिकांना भेडसावणाऱ्या समस्या यावर मार्गदर्शन या कार्यशाळेत करण्यात येणार आहे. प्रभावी आणि शाश्वत उपाययोजनांवर यात चर्चा केली जाणार आहे. तसेच, पुनर्वसन प्रक्रियेतील पारदर्शकता, गती आणि नागरिकांचा विश्वास वाढवण्यासाठी आवश्यक असलेल्या उपाययोजनांवर भर देण्यात येणार आहे. या कार्यशाळेमुळे संबंधित सर्व घटकांना एकत्र आणून झोपडपट्टी पुनर्वसन प्रक्रियेला गती मिळण्यास मदत होईल, असा विश्वास आमदार मंदा म्हात्रे यांनी व्यक्त केला.

सिडको अस्तित्वात येण्यापूर्वी १९६० साली एमआय डीसी ची स्थापना झाली. ठाणे – बेलापूर पट्टीत हजारो लहान–मोठ्या कंपन्या निर्माण होत होत्या. त्या कंपन्यांचा पाया काढून ती उभी करणारे कष्टकरी मजूर कालांतराने इथच स्थिरावले. आजमितीला सुमारे ४२ हजार झोपडीधारक नवी मुंबई शहरात आहेत.

# १२५ शिक्षकांना कारणे दाखवा नोटिस

**पनवेल : वार्ताहर**

भारत निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्देशानुसार छायाचित्र मतदार यादयांची प्रतवारी सुधारण्यासाठी आणि त्या अचूक होण्यासाठी १८८ पनवेल विधानसभा मतदारसंघात मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांची नेमणूक करण्यात आलेली आहे, मात्र निवडणूक कामासाठी उपस्थित न राहिल्याबाबत मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी यांनी तब्बल १२५ शिक्षकांना कारणे दाखवा नोटिसा बजावल्या आहेत.

पनवेल विधानसभा मतदारसंघातील सर्व केंद्रस्तरीय अधिकारी यांनी मतदारांचे मॅपिंग करणे, मतदार यादीतील अस्पष्ट फोटो असलेल्या मतदारांचे रंगीत फोटो घेऊन अद्ययावत करणे, डीएसईच्या नोंदीचे पडताळणी करणे इत्यादी कामांसाठी १८ मार्च ते १५ एप्रिल या कालावधीसाठी पूर्ण वेळ कार्यमुक्त करण्यात आले आहे. त्यांना निवडणुकीच्या कामकाज करण्यासाठी सुचित करण्यात आले आहे. पनवेलमधून शिक्षक, शासकीय कर्मचारी आणि अंगणवाडी सेविका असे एकूण ५७४ बीएलओची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच १२ नोडल ऑफिसर, ५७ सुपरवायझर आणि पाच एइआरओ यांची नियुक्ती करण्यात आली.

निवडणूक कामासाठी उपस्थित राहण्याबाबत पर्यवेक्षकांनी बीएलओ यांना दूरध्वनीमार्फत कळवले आहे, मात्र बीएलओ यांनी उपस्थिती दाखवलेली नाही. तसेच कामासाठी अनुपस्थित असल्याबाबतचा अहवाल देखील सादर केलेला नाही. याबाबतचा खुलासा मतदार नोंदणी अधिकारी यांनी त्यांच्याकडे मागितला आहे. निवडणुकीचे काम केले नाही तर प्रशासकीय आणि फौजदारी कारवाई करण्याचे संकेत देण्यात आले आहेत.

# पणन संचालकपदाचा शरद जरेंकडे अतिरिक्त कार्यभार

**नवी मुंबई : बातमीदार**

राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या प्रशासनात महत्त्वाचा बदल करत मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव शरद जरे यांच्याकडे पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे या पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपवण्यात आला आहे. मंगळवारी या संदर्भातील शासनादेश जारी करण्यात आला असून या निर्णयामुळे पणन विभागात लक्षणीय हालचाल झाल्याचे मानले जात आहे.



पणन संचालक पदावर यापूर्वी संजय कदम कार्यरत होते. त्यांच्या जागी जरे यांच्याकडे ही जबाबदारी सोपवण्यात आली आहे. शासनाने यापूर्वीची स्थानिक कार्यव्यवस्था रद्द करून नव्याने आदेश काढला आहे. ७ एप्रिलपासून हा आदेश लागू झाला असून पुढील आदेश येईपर्यंत जरे हेच या पदाचा कार्यभार सांभाळणार आहेत. उपसचिव नितीन गायकवाड यांनी राज्यपालांच्या आदेशानुसार हा शासनादेश जारी केला आहे.

मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीत सचिव म्हणून कार्यभार स्वीकारल्यानंतर जरे यांनी अनेक गैरव्यवहारांवर कारवाई करत प्रशासनात शिस्त आणण्याचा प्रयत्न केला होता. बाजार समितीतील आर्थिक व प्रशासकीय अनियमिततेविरोधात त्यांनी घेतलेल्या कठोर भूमिकेची दखल शासनस्तरावर घेण्यात आल्याचे सांगितले जाते. त्यांच्या कडक आणि शिस्तबद्ध कामकाजाच्या पार्श्वभूमीवरच ही अतिरिक्त जबाबदारी त्यांच्यावर सोपवण्यात आल्याची चर्चा आहे.

# गव्हाण विद्यालयात स्नेहभोजन

## विद्यार्थी, शाळा समिती व शिक्षकही सहभागी



**पनवेल : रामप्रहर वृत्त**


शालेय विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या पोषण आहारांतर्गत रोजच्या आहारा व्यतिरिक्त चविष्ट व खमंग स्पेशल बिर्याणीचा बेत,सोबत स्थानिक शाळा समितीच्या चेअरमन यांच्यासह सर्व सदस्य,कार्यालयातील सेवक आणि शिक्षक यांचा सहवास...बुधवार ८ एप्रिल रोजी गव्हाण विद्यालयात असा रंगला द्वितीय सत्रातील स्नेहभोजन सोहळा!

'स्नेहभोजन' या संकल्पनेतून रयत शिक्षण संस्थेच्या येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये शालेय पोषण आहार विभाग व उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, उपशिक्षक गुरुकुल प्रमुख संदीप भोईर, उपशिक्षिका प्रतिज्ञा घरत, कनिष्ठ लेखनिक चंद्रकांत मढवी, ग्रंथपाल महेश म्हात्रे शिपाई जनार्दन खैरे यांचे वतीने देण्यात आलेल्या स्नेहभोजनाचा आस्वाद विद्यार्थी, शाळा समिती चेअरमन व सदस्य तसेच सर्व शिक्षकांनी घेतला.

यावेळी चेअरमन अरुणशेठ भगत यांच्यासह स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंताशेठ ठाकूर व विश्वनाथ कोळी, ज्युनिअर कॉलेज स्थानिक शाळा समितीचे सदस्य ॲड. राहुल घरत यांचेसह भार्गव ठाकूर, विद्यालयाचे उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, पर्यवेक्षिका शशिकला पाटील, संस्थेचे लाईफ मेंबर रवींद्र भोईर, लाईफ वर्कर देवेंद्र म्हात्रे, ज्येष्ठ ज्युनिअर कॉलेज शिक्षक राजेंद्र चौधरी आदी उपस्थित होते.

विद्यालयाच्या शालेय पोषण आहार विभागाचे प्रमुख विशांत ठाकूर, ग्रंथपाल महेश म्हात्रे, उपशिक्षिका गीतांजली म्हात्रे व प्रतिज्ञा घरत, अर्चना पाटील व सर्व शिपाई वर्ग आदींचे शिस्तपूर्ण व नेटके नियोजन यांमुळे स्नेहभोजनाचा सोहळा रूचीवर्धक व स्नेहवर्धक ठरला.

### क्लिक...क्लिक...!



**माथेरान : पश्चिमेस असलेला प्रबळगड आणि शेजारील कलावंती महलच्या बरोबर मध्यभागी होणाऱ्या मनमोहक सूर्यास्ताचे संतोष खाडे यांनी टिपलेले विहंगम दृश्य.**

# 'देव घरा आयला' नाटकाला उदंड प्रतिसाद



**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील रांजणपाडा येथील अष्टगंध सांस्कृतिक, कला, सामाजिक मंडळाच्या वतीने मरूआईच्या यात्रेनिमित्त आणि बाबीबाई त्रिंबक पाटील यांच्या स्मृतीप्रित्यर्थ मंगळवारी (दि.७) रात्री दहा वाजता, 'देव घरा आयला' या धनेश्वर म्हात्रे लिखित व हसूराम पाटील दिग्दर्शित तसेच प्रसाद कडू सहदिगदर्शीक दोन अंकी नाटकाचा प्रयोग रांजणपाडा येथील हनुमान मंदिराच्या भव्य पटांगणात सादर करण्यात आला.

नाटककार धनेश्वर म्हात्रे यांनी या नाटकाची आपल्या लेखनातून मांडणी विलक्षण खुबीने केली आहे. आगरी कोळी समाजाच्या संस्कृतीची त्यांच्या मानसिकतेची अतिशय मार्मिकपणे जाण करून देणारे हे नाटक असून, एका सामाजिक, आर्थिक, मानसिक जाणिवेतून हे नाटक लिहिलं गेले आहे. ते पाहताना आपण अस्वस्थ होतो. आजचं संपूर्ण समाजचित्रण नाटककार धनेश्वर म्हात्रे यांनी त्यांच्या राजा, राधा, ज्ञाना, मास्तर, शांताराम, शांती, भग्याशेठ आदी व्यक्तिरेखांतून साकारून विलक्षण जिवंत केले आहेत. अंधश्रद्धेवर प्रकाश टाकणारे हे नाटक समाज प्रबोधन तर करतेच, पण प्रत्येकाला त्यांच्या सामाजिक बांधिलकीची जाणीव करून देतेच, परंतु नाटक पाहताना रसिक प्रेक्षकांना काही काळ हे नाटक स्तब्ध करून ठेवते. दिग्दर्शक हसूराम पाटील यांनी नाटकातील पात्रे जिवंत ठेवण्यासाठी कसब वापरले आहेत.

नाटकात धनेश्वर म्हात्रे, हसूराम पाटील, कृष्णकांत म्हात्रे, दिगंबर कोळी, सुमित कुंभार, अशोक म्हात्रे, जयकिसन मोकल, वैभव म्हात्रे, प्रसाद कडू, अलंकार कडू, वैशाली मोहिते, परेशा सरोदे, शिल्पा काकडे व रुद्र ठाकूर या सर्व कलाकारांनी आपापल्या भूमिकांना योग्य तो न्याय दिला. नाटकाची निर्मिती रमेश चिंतामण कोळी यांची होती. ध्रुवराज म्हात्रे यांच्या ध्वनी संकलनाने नाटकाची उंची वाढली होती. डी वाय म्हात्रे यांची रंगभूषा उठावदार होती. राजा जोशी यांनी भव्य नेपथ्य उभारले होते.

संकल्पना दिगंबर कोळी, मनोहर ठाकूर यांची होती. संतोष साऊंड सर्विस यांची रंगमंच व्यवस्था होती. अध्यक्ष अशोक म्हात्रे, सचिव दत्तात्रेय घरत, खजिनदार प्रज्योत पाटील, गजानन म्हात्रे, नरेंद्र ठाकूर, विद्याधर म्हात्रे, बळीशेठ घरत, दत्तात्रेय म्हात्रे, कैलासराजे घरत, नरेंद्र ठाकूर, जीवन डाकी यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले. ग्रामस्थ मंडळ रांजणपाडा, रुद्र इंटरप्राईजेस, ड्रीम फाउंडेशन, स्वराज मित्र मंडळ व जय हनुमान क्रिकेट क्लब या सर्वांनी नाट्य प्रयोगाचे व्यवस्थापन केले होते.

# मैदानी खेळापेक्षा ऑनलाईन खेळाकडे मुलांचा वाढता कल

उन्हाळ्याच्या सुट्ट्या लागल्या की मैदानी खेळाकडे मुलांची पावले पूर्वी उपसुक वळत असत, मात्र सध्या उन्हाळ्याच्या सुट्ट्या लागूनही मैदानात सन्नाटाच दिसून येत आहे .मामाचे पत्र हरविले ते आम्हाला नाही सापडले, लपंडाव गोट्या, भोवारा, विटी दांडू, कबड्डी, खो–खो, आट्यापाट्या, क्रिकेट, असे विविध खेळ जणू सध्याच्या मुलांना माहितीच नाही अशी परिस्थिती निर्माण झाली असून मुलांचा कल ऑनलाईन खेळाकडे वळत असल्याचे दिसून येत आहे.



बदलत्या काळानुसार पारंपारिक खेळ देखील लोप पावत चाललेले पाहायला मिळत आहे. सध्याच्या एकविसाव्या शतकामध्ये मुलांना पारंपारिक खेळ जणू काही माहितीच नाही असे दृश्यच निर्माण झाले आहे. बहुतांश मुलाच्या हातात स्मार्ट मोबाइल दिसत असल्यामुळे सध्याच्या मुलांचा कल हा ऑनलाईन गेम खेळण्याकडे जास्त दिसत आहे.

पूर्वी सुट्टी लागताच लहान मुले एकत्र जमून विविध खेळ खेळत. त्या खेळांचा गोंगाट कानावर पडायचा. मात्र सध्या तसे नसून सर्वत्र शांतता पसरलेली दिसून येत आहे. विज्ञान जसजशी क्रांती घडवत गेलं तसतसा माणसांमध्ये सुद्धा बदल होत गेला आणि सध्या शहरी भागामध्ये उन्हाळा शिबिर चालवण्याची पद्धत उदयास आली आहे. उन्हाळा शिबिर हे लहान मुलांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी नसून पैसे कमविण्याचे एक नवीनच फॅड निर्माण झाले आहे. पूर्वी मैदानी खेळ खेळून शरीर सुदृढ धष्टपुष्ट बनायचे, मात्र सध्या ऑनलाईन गेम ने मुले कमकुवत बनत चाललेली आहेत

मुलांना मोबाईल कॉम्प्युटर वरील गेमची इतकी आवड निर्माण झाली आहे की, त्यांना एक प्रकारचे व्यसन लागलेली आहे. जर ऑनलाईन गेम उपलब्ध करून दिला नाही तर मुलांमध्ये चिडचिडेपणा वाढू लागला आहे. अनेक मुलं तर मोबाईल शिवाय जेवत देखील नाहीत अशी भयानक परिस्थिती सध्याच्या काळात निर्माण झाली आहे.

लहान मुलांचा लपंडाव, खो–खो, कबड्डी, क्रिकेट, आट्यापाट्या अशा विविध खेळांमुळे शारीरिक व्यायाम होत होता. यामुळे मुलांचे आरोग्य देखील सुदृढ राहत होते. परंतु घरातच बसून मैदानी खेळ न खेळल्यामुळे आज मुलांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे. सध्या फ्लॅट संस्कृती सगळी कडे रुजत आहे. आपल्या मुलांनी बाहेर कुठे खेळायला जाऊ नये आणि घरातच बसून काय ते खेळावे म्हणून त्याला घरात खेळता येतील असे खेळ आणून दिले जातात. या मागे हेतू दोन तीन असतात. एक तर आई– वडील दोघेही कामाला जात असतात. त्यामुळे बाहेर कुठे भटकण्यापेक्षा मुल घरीच सुखरूप राहिलेली चांगली, त्यासाठी त्याला हवे ते घरीच आणून दिले जाते आणि मुलांचे नको ते हट्टदेखील पुरविले जातात. दुसरं म्हणजे काळजी, ती पण अति काळजी. मुल बाहेर खेळायला गेले तर त्याला लागेल, मातीत हात खराब होतील अशी भलतीच काळजी. त्यातूनही एखादा पालक जर मातीत खेळायला सोडत असेल तर त्याला ढीगभर नियम, चपलाच घालून जा, जास्त वेळ मातीत खेळू नकोस, आल्यावर हात पाय साबणाने धुवा अशी नियमांची सरबत्तीच त्यांच्यापुढे चालूच राहते. मुलं विचार करत असतील की, इतके नियम पाळण्यपेक्षा मातीत न खेळलेल बर. सर्वसामान्यांची मुले सोडली तर अफाट पैसेवाले पालक मुलांना कोणत्या तरी शिकवणी मध्ये सारखीच गुंतवून ठेवतात. कोणी कराटेच्या, कोणी नाचण्याच्या, कोणी चित्रकलेच्या, कोणी तबल्याच्या.. प्रत्येकाची वेगळी पध्दत जगाच्या वेगळीच पाहायला मिळते. प्रत्येकाच्या पालकांना वाटत आपल्या मुलाने शिकून खूप मोठं व्हावं मग त्यासाठी कसून मेहनत करून घेण्याच्या नादात आपली संस्कृती, परंपरा, मैदानी खेळ लोप पावत चालले आहेत हे त्यांच्या लक्षातच येत नाही.

पारंपरिक खेळ एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे जातात, मात्र शहरी भागासारख्या अन्य ठिकाणी उन्हाळा शिबिर राबवून उरलेले सुरलेले खेळ तरी तग धरून राहतील का? असा सवाल उठत आहे.

**–अशोक शेषवरे,**
नवी मुंबई

# कोळी समाजाला समृद्ध करण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध -मंत्री नितेश राणे

## एकदरा येथे ग्रोयन्स बंधाऱ्याचे भूमिपूजन



**मुरूड : प्रतिनिधी**

कोळी समाजास समृद्ध करून त्यांचे जीवन सुखी व समाधानी करण्यासाठी राज्यशासन कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन राज्याचे बंदर व मत्स्यमंत्री नितेश राणे यांनी केले आहे.

एकदरा खाडीवर ग्रोयन्स बंधारा बांधण्याच्या भूमिपूजन कार्यक्रमासाठी मंत्री नितेश राणे मुरूड येथे आले होते. त्यांच्या शुभ हस्ते भूमिपूजन करण्यात आले. यावेळी त्यांच्या समवेत आमदार महेंद्र दळवी, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, जिल्हा परिषद उपाध्यक्ष मधुकर पाटील, जिल्हा परिषदचे सभापती वैकुंठ पाटील, आस्वाद पाटील, मुरुड नगरपरिषद नगराध्यक्षा आराधना दांडेकर, विजय गीदि, प्रकाश सरपाटील, चेअरमन पांडुरंग आगरकर, जगन वाघरे, चिंता लोदी, ध्रुव लोदी, कोळी समाज अध्यक्ष किसन बळी, उपाध्यक्ष मनोहर मकू, सुरेन्द्र मकू तसेच नगरसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी मंत्री नितेश राणे आपल्या भाषणात म्हणाले की, कोळी समाज आर्थिक दृष्ट्या सक्षम होण्यासाठी महाविकास आघाडीचे सरकार आपल्या सोबत असून फक्त एकाच वर्षात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली खूप महत्वपूर्ण निर्णय कोकणातील मच्छिमांसाठी घेण्यात आले असून याचा फायदा दूरगामी वर्षांनी सुद्धा मिळणार आहे. फक्त कोळी समाजाने काम करणाऱ्या पक्षासोबत राहणे खुप आवश्यक आहे. माझ्या बंदर व मत्स्य विभाने मच्छीमारीला शेतीचा दर्जा दिला आहे. एलइडीवर कायम स्वरुपी बंदी असून त्यावर कडक कार्यवाहीचे निर्देश देण्यात आले आहेत. पूर्वी प्रांतप्रधान मत्स्य विभागाकडून मच्छीमारांना विविध योजनेचे फायदे मिळत होते ते आता ६ मार्च रोजी अर्थसंकल्पात विशेष तरतूद करून मुख्यमंत्री मत्स्यसंपदा योजना सुरू करण्यात आली आहे. त्यामुळे केंद्र सरकार प्रमाणे राज्य शासन सुधा कोळी समाज यांना विविध योजनांचा फायदा प्राप्त करून देणार आहे.

६३० मीटर लांब व संरक्षण भिंत असणारा बंधारा बांधण्यासाठी ९२ कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहे. खाडी मधील गाळ काढण्यात आल्यावर बोटी सहज ये जा करू शकणार आहेत. २४ महिन्यात हे काम पूर्ण करण्यात येणार असून या कामाचा दर्जा उत्तम राखला जाणार आहे. सर्व खात्याच्या परवानग्या घेतल्यावरच या कामाची रक्कमेची तरतूद करण्यात आली आहे. या बंधाऱ्यामुळे पर्यटन वृद्धी होणार असून स्थानिकांना स्वयंरोजगार मिळण्यास मदत होणार आहे. पूर्वी मत्स्य विभागाचा बजेट फारच कमी होता तो आता १२४० कोटी रुपये बजेट करण्यात आला आहे. या बजेट मधूनच कोळी समाजास बर्फ फॅक्टरी, जाळे विकत घेणे नौकांसाठी कर्ज अश्या सुविधा प्राप्त होणार आहेत. मत्स्य विभाग आगामी काळात सक्षम बनवण्यासाठी लाकडी बोटी ऐवजी स्टील मध्ये असणाऱ्या वेगवान २० बोटी लवकरच घेण्यात येणार आहेत. एल इ डी बोट धारकास मच्छीमार सोसायटी कडून डिझेल दिले गेल्यास त्या सोसायटीचा परवाना रद्द करण्यात येणार आहे.कोळी समाजाच्या जागेवर अनधिकृत बांधकाम खपून घेतले जाणार नाही असा इशारा सुद्धा यावेळी त्यांनी दिला.

यावेळी स्थानिक आमदार महेंद्र दळवी यांनी मुरुड व अलिबाग येथील ग्रोयन्स बंधारा निर्मितीसाठी १८० कोटी रुपयांची तरतूद केल्याबद्दल मंत्री नितेश राणे यांचे विशेष आभार व्यक्त केले. राणे हे धडाडीचे मंत्री असून त्यांनी घेतलेल्या प्रत्येक निर्णयाची अंमलबजावणी होत असते. ग्रोयन्स बंधारा बांधण्यात असल्याने पुढील काळात पर्यटन व्यवसायास चालना मिळणार असल्याचे यावेळी सांगितले. सदरील कार्यक्रमाचे आभार विजय गीदी यांनी व्यक्त केले. सदरील कार्यक्रमासाठी असंख्य मच्छीमार समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## माणगावात उद्या आंतरराष्ट्रीय रसायनशास्त्र परिषद

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाच्या द. ग. तटकरे महाविद्यालयात ११ एप्रिल २०२६ रोजी "रसायनशास्त्रातील उदयोन्मुख प्रवाह : सीमांपलीकडील नवोपक्रम" या विषयावर एकदिवसीय आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली आहे. ग्रामीण भागातील महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय स्तरावरील शैक्षणिक उपक्रम राबविण्याची ही उल्लेखनीय परंपरा कायम राखत, या परिषदेच्या माध्यमातून जागतिक स्तरावरील संशोधन व ज्ञान देवाणघेवाणीसाठी व्यासपीठ उपलब्ध करून दिले जाणार आहे.

महाविद्यालयाच्या विज्ञान विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष आयक्यूएसी यांच्या संयुक्त विद्यमाने होणाऱ्या या परिषदेचे उद्घाटन शनिवार, ११ एप्रिल रोजी होणार असून, देशातील विविध राज्यांबरोबरच आंतरराष्ट्रीय स्तरावरील संशोधक, प्राध्यापक आणि तज्ज्ञ यांचा सहभाग अपेक्षित आहे. या परिषदेकरिता प्रमुख पाहुणे म्हणून मुंबई विद्यापीठाचे आयसी रजिस्ट्रार व आजीवन अध्ययन विस्तार विभागाचे संचालक डॉ. बळीराम गायकवाड उपस्थित राहणार आहेत. तसेच प्रमुख वक्ते म्हणून नॅशनल सेंटर फॉर नॅनोसायन्स अँड नॅनोटेक्नॉलॉजी, मुंबई विद्यापीठाचे संचालक डॉ. विश्वनाथ पाटील मार्गदर्शन करणार आहेत.

याशिवाय अमेरिका येथील मुफित कॅन्सर केंद्राचे डॉ. मुकुंद तंटक, सी. के. टी. कॉलेज पनवेलचे प्राचार्य डॉ. एस. के. पाटील, पुण्यातील पुना महाविद्यालयाचे डॉ. इक्बाल शेख, शिवले कॉलेज मुरबाडचे डॉ. मधुकर बडगुजर तसेच किर्ती महाविद्यालय मुंबईचे डॉ. संजय सोनावले हे विविध विषयांवर आपले विचार मांडणार आहेत.

सेंद्रिय, असेंद्रिय आणि भौतिक रसायनशास्त्र, पदार्थ विज्ञान, नॅनोतंत्रज्ञान, हरित रसायनशास्त्र तसेच औद्योगिक रसायनशास्त्र या क्षेत्रांतील नव्या संकल्पना व संशोधन कार्य यावर चर्चासत्रे होणार असून, जागतिक समस्यांवर उपाय शोधण्यासाठी वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करण्यावर भर दिला जाणार आहे. माणगाव सारख्या तालुक्याच्या ठिकाणी अशा आंतरराष्ट्रीय दर्जाच्या परिषदांचे सातत्याने आयोजन होत असल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष अॅड. राजीव अशोक साबळे यांनी समाधान व्यक्त करत आयोजकांना शुभेच्छा दिल्या.

परिषदेच्या यशस्वी आयोजनासाठी प्राचार्य डॉ. बी. एम. खामकर यांच्यासह विविध महाविद्यालयांचे प्राचार्य व मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे. या परिषदेसाठी प्रमुख संयोजक सहाय्यक प्राध्यापक मेहरीन डावरे (संपर्क : ९१६८४३९७५३) तसेच समन्वयक डॉ. जे. आर. पांडेय (संपर्क : ९४२११६६८००) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## वावंढळ येथील शाळेला बोअरवेलची सुविधा

### हरी ओम चॅरिटेबल ट्रस्टचा स्तुत्य उपक्रम

**चौक : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वावंढळ येथे सामाजिक उपक्रमांद्वारे खोदलेली बोअरवेल शाळेला उपसरपंच ललिता रामदास काईनकर यांच्या हस्ते अर्पण करण्यात आली.

वावंढळ प्राथमिक शाळेला कायमस्वरूपी पाण्याची सोय नव्हती, ग्राम पंचायत वावंढळ यांनी ग्रामपंचायत निधीतून ही बोअरवेल खोदून दिली, पिण्यायोग्य पुरेसे पाणी उपलब्ध झाल्याने हरी ओम चॅरिटेबल ट्रस्ट मुंबई यांनी सामाजिक कार्यकर्ते व अपघातग्रस्त यांना मदत करणारे वृक्ष लागवड करणारे, निसर्गप्रेमी रामदास काईनकर यांच्या मदतीने व हरी ओम चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या सहकार्यातून पूर्ण पाईप लाईन व मोटर पंप बसविण्याचे काम केले.



याबाबत शाळा मुख्याध्यापिका योगिता पाटील यांनी पाठपुरावा केला होता. विद्यार्थ्यांच्या पिण्याच्या पाण्याची, जेवण करण्यासाठी, स्वच्छतागृह यांच्या साठी पाण्याची सोय झाली आहे. या बोअरवेल मुळे शाळा परिसरात परस बाग करण्यात आली असून, वृक्ष लागवड करण्याचा मनोदय शाळा समिती यांनी केला आहे.

या नव्या सुविधेचे उद्घाटन उपसरपंच ललिता रामदास काईनकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी माजी सरपंच अर्जुन कदम, दीपक पंदेकर, सामाजिक कार्यकर्ते रामदास काईनकर, शाळा समिती अध्यक्ष सौ.पवार, मुख्याध्यापिका योगिता पाटील, योगेश खोत, अनिल गाडगे, भाग्यश्री सातपुते, ग्रामपंचायत अधिकारी मंगल केदारे उपस्थित होते.

## बोरघरच्या प्रणय भगतचे पोलीस भरतीत यश

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील बोरघर गावातील तरुण प्रणय वैशाली बंडू भगत याने पुणे सिटी पोलीस शिपाई भरतीमध्ये उल्लेखनीय यश मिळवत आपल्या कुटुंबासह संपूर्ण गावाचे नाव उज्वल केले आहे. त्याच्या या यशामुळे परिसरात आनंदाचे आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

प्रणय हा बीएससी शिक्षण पूर्ण केलेला असून, शिक्षणानंतर त्याने धाटाव औद्योगिक क्षेत्रातील अनेक रासायनिक कारखान्यांमध्ये काम करत कष्टाची खरी जाणीव अनुभवली. दिवसाचे काम आणि त्यानंतर मैदानावर घाम गाळत केलेली तयारीया दुहेरी संघर्षातून त्याने स्वतःला घडवलं. अनेक वर्षांच्या मेहनतीचे हेच फलित आज त्याला मिळाले आहे.

विशेष म्हणजे, त्याच्या मनामध्ये सुरुवातीपासूनच एक स्पष्ट ध्येय होतं.



धाटाव एमआयडीसीमध्ये कायमस्वरूपी नोकरी करण्याऐवजी "पोलीस दलात भरती होऊन जनतेची सेवा करायची" हा निर्धार त्याने मनाशी पक्का केला होता. आजूबाजूचे अनेकजण औद्योगिक क्षेत्रात स्थिरावत असताना, प्रणयने मात्र आपला मार्ग वेगळा निवडत त्यावर ठामपणे वाटचाल केली. गेल्या दोन वर्षांपासून त्याने संघर्ष अकॅडमी, किनवली येथे प्रशिक्षण घेतले. शारीरिक आणि लेखी परीक्षेसाठी त्याने सातत्याने मेहनत घेतली. २२ तारखेला पुणे पोलीस मुख्यालय येथे झालेल्या परीक्षेत त्याने १३० गुण मिळवत उल्लेखनीय कामगिरी केली. या भरतीची अंतिम कटऑफ १२९ गुणांवर बंद झाली असताना, एक गुण जास्त मिळवत त्याने पात्रता मिळवली.

दरम्यान, प्रणयच्या यशानंतर बोरघर गावात जल्लोषाचे वातावरण पाहायला मिळाले. गावकऱ्यांनी त्याचे उत्स्फूर्त स्वागत करत फटाक्यांची आतषबाजी केली. रात्री भव्य मिरवणूक काढण्यात आली असून ढोल-ताशांच्या गजरात गावभर त्याचे स्वागत करण्यात आले. तसेच घरोघरी जाऊन त्याचे अभिनंदन करण्यात आले.

## स्व. उषा पवार यांच्या पुण्यस्मरणानिमित्त कार्यक्रम

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील निजामपूर समर्थ नगर येथे ह.भ.प. उषा दत्तुशेठ पवार यांच्या द्वितीय पुण्यस्मरणा निमित्त समस्त पवार परिवारांच्या वतीने ११ एप्रिल २०२६ रोजी शनिवारी त्यांचे राहते घरी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास उपस्थित राहून नागरिक, भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन पवार परिवाराकडून करण्यात आले आहे.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी १० ते ११ या वेळेत प्रतिमा पूजनाने होणार आहे. त्यानंतर सायंकाळी ५ ते ७ या वेळेत सामुदायिक हरिपाठाचे आयोजन करण्यात आले असून निजामपूर सह परिसरातील भाविक मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. तर रात्री ७ ते ९ या वेळेत ह.भ.प. वांजळे महाराज यांच्या सुश्राव्य कीर्तनाचा भव्य कार्यक्रम होणार आहे.

द्वितीय पुण्यस्मरण सोहळ्याचे आयोजन सांप्रदाय उपाध्यक्ष ह.भ.प. दत्तुशेठ रामजी पवार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले असून सुधीर दत्तुशेठ पवार, गणेश दत्तुशेठ पवार, रिया रामदास पवार, जनाबाई दत्ताराम उतेकर, रेणुका अनंत महाडीक, शुभांगी बाळाराम दबडे, मंगळ योगेश पतकी आदींसह समस्त पवार परिवार यासाठी अधिक परिश्रम घेत आहेत.

## रोहा एकता नगरमध्ये स्वप्नांद फिल्म एआय स्टुडिओचे उद्घाटन

**धाटाव, रोहा : प्रतिनिधी**

एकता नगर येथील निनांद शिंदे यांनी आपल्या आईच्या नावाने 'स्वप्नांद फिल्म एआय स्टुडिओ' हा नवा उपक्रम सुरू केला आहे. या स्टुडिओचे उद्घाटन वरदा वहिनी सुनील तटकरे यांच्या शुभ हस्ते उत्साहात पार पडले.

यावेळी योगा प्रशिक्षक विभा चोरगे, सिने कलाकार सायली स्वामी सायली स्वामी, ग्रुप ग्रामपंचायत वरसे सरपंच रामाशेट म्हात्रे, रोहा नगरपालिका गटनेते महेंद्र गुजर, नगरसेवक महेश धाटावकर, नगरसेविका निता हजारे, नगरसेविका स्नेहा आंब्रे, गड किल्ले अभ्यासक सुखंद राणे यांच्या उपस्थितीत संपन्न झाले.

निनांद शिंदे यांनी या स्टुडिओच्या माध्यमातून सामान्य नागरिकांना



आधुनिक तंत्रज्ञानाचा लाभ मिळावा, यासाठी प्रयत्न केले जाणार असल्याचे सांगितले. निनांद यांची नेहमीच नवीन उपक्रम राबवण्याची जिद्द आणि चिकाटी असून, त्यांनी महिलांसाठी 'पैठणी खेळ' जिल्हाभर आयोजित करून उत्साह निर्माण केला आहे. तसेच बालकलाकारांना एकत्र आणून त्यांनी उत्कृष्ट नृत्य कार्यक्रमही सादर केले आहेत. याशिवाय त्यांनी दोन लघुपटांची निर्मिती करून रायगड जिल्ह्यात आपला वेगळा ठसा उमटवला आहे.

या उद्घाटन सोहळ्यास गणेश शिवलकर, राकेश गुरव, समाधान शिंदे, मनोहर सकपाळ तसेच एकता नगरमधील ग्रामस्थ, महिला मंडळ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बी.फार्मसी हिवाळी २०२५ परीक्षांचे निकाल जाहीर

**माणगाव : प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ बाटू लोणेरे यांनी बी.फार्मसी अभ्यासक्रमाच्या नियमित रेगुलर तसेच पूरक सप्लीमेंट्री हिवाळी २०२५ परीक्षांचे निकाल जाहीर केले आहेत. या निर्णयामुळे विद्यार्थ्यांमध्ये समाधान व उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी मार्ग मोकळा झाला आहे.

विद्यार्थ्यांना आपले निकाल संबंधित महाविद्यालयांच्या माध्यमातून ऑनलाईन पद्धतीने पाहता येणार आहेत. तसेच, निकालाचे सविस्तर लेजर संबंधित संस्थांच्या लॉगिनमध्ये उपलब्ध करून देण्यात आले असल्याची माहिती विद्यापीठ प्रशासनाकडून देण्यात आली आहे. यंदाच्या निकालामध्ये नियमित विद्यार्थ्यां सोबतच पूरक परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांचाही समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे अपयशी ठरलेल्या विद्यार्थ्यांना पुन्हा संधी मिळून त्यांच्या शैक्षणिक प्रगतीला चालना मिळाली आहे. निकाल जाहीर झाल्यानंतर अनेक विद्यार्थ्यांनी समाधान व्यक्त केले असून, पुढील शैक्षणिक टप्प्यांसाठी जसे की पुढील वर्षात प्रवेश, इंटर्नशिप किंवा उच्च शिक्षण या साठी आता तयारीला सुरुवात केली आहे.

दरम्यान, निकालामध्ये कोणतीही त्रुटी किंवा शंका आढळल्यास विद्यार्थ्यांनी तत्काळ आपल्या संबंधित महाविद्यालयाशी किंवा विद्यापीठाच्या परीक्षा विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन विद्यापीठ प्रशासनाने केले आहे.



**मुरूड : पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे यांना वाढदिवसानिमित्त शिवसेनेचे जिल्हा उपप्रमुख भरत बेलोसे, प्रवासी संघटनेचे अध्यक्ष श्रीकांत सुर्वे, शिवसेनेचे ज्येष्ठ नेते सी.एम. ठाकूर, मितेश पाटील आदींनी शुभेच्छा दिल्या.**

## यशवंत कुंभार यांना रायगड समाज भूषण पुरस्कार

**कर्जत : प्रतिनिधी**

खांडपे येथे राहणारे व राजकीय-सामाजिक-कामगार-सहकार क्षेत्रात आजपर्यंत कार्यरत असलेले यशवंत काळूराम तथा वाय. के. कुंभार यांना 'रायगड समाज भूषण' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

माणगाव येथील कुणबी



समाज सभागृहात कुंभार समाज मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महाराष्ट्र प्रदेश संस्थापक अध्यक्ष सतीश दरेकर, प्रदेश अध्यक्ष रमाकांत क्षीरसागर, महिला आघाडी अध्यक्ष रसिका खेडेकर, प्रदेश कार्याध्यक्ष महेश सायकर, प्रदेश युवक अध्यक्ष संदीप पाटील, कोकण प्रांत अध्यक्ष प्रकाश साळवी, कोकण प्रांत महिला आघाडी अध्यक्ष वीणा चौलकर, रायगड जिल्हा युवक अध्यक्ष शरद कुंभार आदी उपस्थित होते. यावेळी वाय. के. कुंभार यांना रायगड समाज भूषण पुरस्कार देऊन सन्मानीत करण्यात आले.

## गोरेगाव महाविद्यालयाचा वार्षिक पारितोषिक व पदवी प्रदान सोहळा

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुका एज्युकेशन सोसायटीचे दोशी वकील आर्टस् अँड जी.सी.यू. बी. सायन्स अँड कॉमर्स कॉलेज, गोरेगाव येथे वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा तसेच पदवी प्रदान कार्यक्रम मंगळवार ७ एप्रिल रोजी उत्साहात झाला.



कार्यक्रमास संस्थेचे विश्वस्थ व चेअरमन श्रीनिवास बेंडखळे, उपाध्यक्ष अरुणा दिलीपशेठ, सदस्या साक्षी गांधी यांच्यासह महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जनार्दन होटकर, उपप्राचार्य विवेक पाटील, परीक्षा विभाग प्रमुख डॉ. श्रीकांत चांदोरकर व सर्व प्राध्यापक उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली.

प्राचार्य डॉ. जनार्दन होटकर यांनी प्रास्ताविकात शैक्षणिक वर्षातील गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या यशामागील परिश्रम व प्रगतीचा आढावा घेतला. यानंतर प्रमुख अतिथींच्या हस्ते विद्यार्थ्यांना विविध पारितोषिके प्रदान करण्यात आली. तसेच महाविद्यालयातील शिक्षकांनी मिळवलेल्या एकूण चार पेटंट्सबद्दल चेअरमन श्रीनिवास बेंडखळे यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. दुपारी पदवी प्रदान सोहळा पार पडला. या वेळी कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील उत्तीर्ण विद्यार्थ्यांना मुंबई विद्यापीठाद्वारे प्रदान करण्यात आलेली पदवी प्रमाणपत्रे मान्यवरांच्या हस्ते देण्यात आली.

चेअरमन श्रीनिवास बेंडखळे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. सूत्रसंचालन मराठी विभाग प्रमुख प्रा. ईश्वर ढोले यांनी केले, तर इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. सुभाष कदम यांनी समन्वयक म्हणून जबाबदारी पार पाडली.

# गुजरातचा दिल्लीवर रोमहर्षक विजय

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

दिल्ली येथील अरुण जेटली स्टेडियमवर बुधवारी शेवटच्या चेंडूपर्यंत रंगतदार झालेल्या सामन्यात गुजरात टायटन्सच्या संघाने घरच्या मैदानावर खेळणाऱ्या दिल्ली कॅपिटल्सला अवघ्या एक धावेने पराभूत केले. यासह गुजरात टायटन्सने हा सामना जिंकत यंदाच्या हंगामातील पहिला विजय निश्चित केला.



गुजरात टायटन्सच्या संघाने दिलेल्या २११ धावांचा पाठलाग करताना पथुम निसंका आणि लोकेश राहुल जोडीने संघाला दमदार सुरुवात करुन दिली. निसंका २४ चेंडूत ४१ धावा करून परतल्यावर लोकेश राहुलने सामन्याची सूत्रे आपल्या हाती घेतली. त्याने ५२ चेंडूत ११ चौकार आणि चार षटकारांच्या मदतीने ९२ धावा करत सामना दिल्ली कॅपिटल्सच्या बाजूने सेट केला, पण मोहम्मद सिराजने १७ व्या षटकातील अखेरच्या चेंडूवर राहुलची विकेट घेत सामन्यात ट्विस्ट आणला.

संघ अडचणीत सापडला असताना बोटाच्या दुखापतीमुळे मैदान सोडलेला डेविड मिलर पुन्हा मैदानात उतरला. २० चेंडूत तीन चौकार आणि तीन षटकारासह नाबाद ४१ धावा करत त्याने दिल्लीच्या विजयाच्या आशा पल्लवित केल्या, पण अखेरच्या षटकात १३ धावांचा बचाव करताना प्रसिद्ध कृष्णाने १० धावा खर्च करत संघाला विजय मिळवून देण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. दिल्लीच्या संघ निर्धारित २० षटकांत आठ विकेट्सच्या मोबदल्यात २०९ धावांवरच अडखळला.

### शेवटच्या षटकात थरार

*दुखापतग्रस्त झाल्याने मैदान सोडलेला डेव्हिड मिलर अर्धा संघ तंबूत परतल्यावर पुन्हा मैदानात उतरला. अखेरच्या १२ षटकात ३६ धावांची गरज असताना केएल राहुल बाद झाल्यावर मिलरने दिल्ली कॅपिटल्सच्या संघाला मॅचमध्ये आणले, पण अखेरच्या चेंडूवर दोन धावांची गरज असताना पाचव्या चेंडूवर मिलरने एक धाव घेण्यास नकार दिला. एक चेंडूवर दोन धावांची गरज असताना प्रसिद्ध कृष्णाने निर्धाव चेंडू टाकला अन् विक्रमी धावांचा पाठलाग करण्यात दिल्ली कॅपिटल्सचा संघ अपयशी ठरला.*

दिल्ली कॅपिटल्सविरुद्ध धावांचा बचाव करताना गुजरात टायटन्सच्या संघाकडून राशीद खान याने सर्वाधिक तीन विकेट्स घेतल्या. त्याने १०व्या षटकात नितीश राणा आणि समीर रिझवी बॅक टू बॅक तंबूचा रस्ता दाखवला. हा मॅचचा टर्निंग पॉइंट होता. त्यामुळेच त्याला सामनावीर पुरस्काराने गौरविण्यात आले. याशिवाय अक्षर पटेलच्या रूपात त्याने तिसरी विकेट घेतली. निर्णायक षटक टाकणाऱ्या प्रसिद्ध कृष्णाने दोन, तर मोहम्मद सिराजने एक विकेट घेतली.

तत्पूर्वी पहिल्यांदा फलंदाजी करताना साई सुदर्शनच्या रुपात गुजरात टायटन्सच्या संघाने १९ धावांवर पहिली विकेट गमावली होती. त्यानंतर जोस बटलर आणि शुबमन गिल जोडी जमली. दोघांनी दुसऱ्या विकेटसाठी ३२ चेंडूत ६० धावांची दमदार भागीदारी रचली. बटलरने २७ चेंडूत ५२ धावांची दमदार खेळी केली. कर्णधार गिलने ४५ चेंडूत ७० धावा, तर वॉशिंग्टन सुंदरने ३२ चेंडूत ५५ धावांचे महत्त्वपूर्ण योगदान दिले. या तिघांच्या अर्धशतकाच्या जोरावरच गुजरातने २१० धावा करत दिल्ली कॅपिटल्ससमोर तगडे आव्हान ठेवले होते.

## आशियाई अजिंक्यपद कुस्ती स्पर्धेत नितेशला रौप्यपदक

**बिश्केक : वृत्तसंस्था**




किर्गिझस्तान येथे सुरू असलेल्या वरिष्ठ गटाच्या आशियाई अजिंक्यपद कुस्ती स्पर्धेत ग्रीको-रोमन प्रकारात भारताच्या नितेशला (९७ किलो) रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. सचिन सहरावत (६७ किलो) आणि प्रिन्स (८२ किलो) यांनी चमकदार विजय मिळवून कांस्यपदक जिंकले. दरम्यान, हंसिका लांबा (५९ किलो) आणि नेहा (५९ किलो) या दोघींनाही कांस्यपदकाची संधी निर्माण झाली आहे.

पुरुषांच्या ९७ किलो वजनी गटात सुवर्ण लढतीत भारताच्या नितेशला इराणच्या महंमदहादी सारवी याच्याकडून एकतर्फी लढतीत १-७ असा पराभव पत्करावा लागला. तत्पूर्वी सचिन सहरावत याने इराणच्या अब्दुमलिक अमिनोव याचा ६-५, तर प्रिन्सने दिदार अमन्नाझारोव याचा १०-१ असा पराभव करून कांस्यपदक मिळविले.

महिलांमध्ये कझाकस्तानच्या शुगीला ओमिबेथ हिला गुणांवर ७-० असे पराभूत केल्यानंतर हंसिकाला उपांत्य फेरीत चीनच्या युशुआन ली हिच्याकडून १-११ असा पराभव पत्करावा लागला. हंसिका आता कांस्यपदकासाठी अरुके काडीरबेलिझी हिच्याशी लढेल. नेहा उपांत्य फेरीत चीनच्या मेंग्यू शिए हिच्याकडून पराभूत झाली. आता नेहा कांस्यपदकासाठी बोलोर्टुया खुलरेखू हिच्याशी खेळेल. नीलमला ५० किलो वजनी गटातून रेपिचेजमधून कांस्यपदकाच्या शर्यतीत येण्याची संधी आहे. उपांत्यपूर्व फेरीत जपानच्या युई सुसाकीकडून नीलमला ०-११ असा पराभव पत्करावा लागला. सुसाकीने पुढे जाऊन अंतिम फेरी गाठल्यामुळे नीलमला रेपिचेजमधून संधी मिळेल.

## शुबमन गिलला १२ लाखांचा दंड



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयपीएलमध्ये गुजरात टायटन्सने दिल्ली कॅपिटल्सवर शेवटच्या चेंडूवर एक धावेने थरारक विजय मिळवला, मात्र या विजयानंतर गुजरातचा कर्णधार शुबमन गिलवर स्लो ओव्हर रेटमुळे १२ लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे.

आयपीएलच्या आचारसंहितेनुसार निर्धारित वेळेत षटके पूर्ण न केल्यामुळे गुजरात टायटन्सवर ही कारवाई करण्यात आली आहे. आयपीएलने प्रसिद्ध केलेल्या पत्रकात म्हटले आहे की, गुजरात टायटन्सचा या हंगामातील हा स्लो ओव्हर रेटचा पहिलाच गुन्हा असल्याने आयपीएलच्या आचारसंहितेनुसार (कलम २.२२) कर्णधार शुबमन गिलला १२ लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. या मोसमात दंडात्मक कारवाई झालेला गिल हा दुसरा कर्णधार ठरला आहे. यापूर्वी श्रेयस अय्यरलादेखील अशाच प्रकारे दंड सोसावा लागला होता.


हा पहिला गुन्हा असल्याने केवळ दंडावर निभावले आहे, मात्र दुसऱ्यांदा हा गुन्हा घडल्यास दंडाची रक्कम वाढते आणि तिसऱ्या वेळी कर्णधारावर एका सामन्याच्या बंदीची कारवाई होऊ शकते.

## ओम् ज्ञानदीप मंडळाची व्यावसायिक कबड्डी स्पर्धा

**मुंबई : प्रतिनिधी**

ओम् ज्ञानदीप मंडळाच्या विद्यमाने महाराष्ट्र राज्य व मुंबई शहर कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने १४ ते १७ एप्रिल या कालावधीत हंगामातील पहिल्या व्यवसायिक पुरुष गट कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्ताने ओम् ज्ञानदीप मंडळाने प्रभादेवी, वरळी येथे कबड्डी रसिकांना प्रो-कबड्डी स्टार खेळाडूचा खेळ प्रत्यक्ष पहाण्याची संधी उपलब्ध करून दिली आहे.

आदर्श नगर येथील वरळी स्पोर्ट्स क्लबच्या मैदानावरील मॅटच्या २ क्रीडांगणावर ही स्पर्धा सायंकाळच्या सत्रात प्रखर विद्युत झोतात खेळविण्यात येईल. भारत पेट्रोलियम, युवा पलटण, मध्य रेल्वे, युनियन बँक, मुंबई बंदर, न्यू इंडिया एन्शुरन्स, मुंबई पोस्टल, सीजीएसटी, पश्चिम रेल्वे, रूपाली ज्वेलस, सचिवालय जिमखाना, स्वामी समर्थ स्पोर्टस् या



मुंबईतील व्यावसायिक संघा बरोबर डीपीयु पुणे, ठाणे महानगर पालिका, एचएएल नाशिक आदी नामवंत संघ या स्पर्धेत सहभागी होणार आहेत. स्पर्धा प्रथम साखळी व नंतर बाद पद्धतीने खेळविली जाईल.

या स्पर्धेच्या निमित्ताने संघ व खेळाडूंच्या कौशल्यावर रोख रकमेबरोबरच आकर्षक भेटवस्तूंची लयलूट करण्यात आली आहे. अंतिम विजयी होणाऱ्या संघास रोख एक लाख पन्नास हजार रुपये व चषक, तर उपविजेत्या संघास रोख एक लाख रु. व चषक प्रदान करण्यात येईल. उपांत्य उपविजयी दोन्ही संघाना प्रत्येकी रोख ५० हजार रु. व चषक देऊन गौरविण्यात येईल. स्पर्धेत सर्वोत्तम ठरणाऱ्या खेळाडूस मोटर बाईक बहाल करण्यात येईल. उत्कृष्ट चढाई व पकडीच्या खेळाडूस प्रत्येकी वॉशिंग मशिन बक्षिसादाखल देण्यात येईल. प्रत्येक दिवसाचा मानकरी ठरणाऱ्या खेळाडूस एलईडी टीव्ही प्रदान करण्यात येईल. सामनावीर ठरणाऱ्या प्रत्येक खेळाडूस ट्रॉली बॅग देण्यात येईल. सामना पहाण्यास येणाऱ्या क्रीडा रसिकाना खूष करण्यासाठी प्रतिदिनी पाच लकी ड्रॉच्या सोडत काढण्यात येतील, अशी माहिती मंडळाचे सचिव रोहित वारेकर यांनी एका पत्रकाद्वारे दिली. अधिक माहितीकरता जितेश शिरवाडकर (८८५०८३४९०६) किंवा सुनील करंबळे (९८९२१४६८२८) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## बिली जीन किंग चषक टेनिस स्पर्धेत भारतीय महिला संघाचा 'किवीं'वर विजय

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पुण्याची वैष्णवी आडकर आणि सहजा यमलापल्ली यांच्या चमकदार कामगिरीच्या जोरावर भारतीय महिला संघाने बिली जीन किंग चषक टेनिस स्पर्धेतील आशिया/ओशियाना विभागाच्या पहिल्या गटातील सामन्यात न्यूझीलंडवर ३-० असा विजय मिळवला. याआधी झालेल्या लढतीमध्ये भारताला थायलंडकडून १-२ असे पराभूत व्हावे लागले होते.

न्यूझीलंडविरुद्ध पहिल्या एकेरीच्या सामन्यात वैष्णवीने ऐशी दासला एक तास ३० मिनिटे चालेल्या सामन्यात ६-२, ६-४ असे सरळ सेटमध्ये नमवले. यानंतर सहजाने व्हॅलेंटिन इवानोवला दुसऱ्या एकेरीच्या लढतीत ६-१, ६-३ असे पराभूत करत भारताला २-० असे आघाडीवर नेले. महिला दुहेरीच्या सामन्यात ऋतुजा भोसले आणि अंकिता रैना जोडीने जागतिक क्रमवारीत ११व्या स्थानी असणाऱ्या एरिन रूटलिफ आणि जागतिक क्रमवारीत ३३८व्या स्थानावरील मोनिक बॅरी जोडीला ६-४, ६-२ असे नमवले.

## दिल्लीच्या पराभवानंतर डेव्हिड मिलरला अश्रू अनावर

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयपीएलमध्ये बुधवारी रात्री झालेल्या अत्यंत रोमहर्षक लढतीत गुजरात टायटन्सने दिल्ली कॅपिटल्सवर अवघ्या एका धावेने विजय मिळवला. अखेरच्या षटकात संघाचा विजय जवळपास निश्चित झालेला असताना डेव्हिड मिलरने केलेली एक छोटीशी चूक दिल्लीला नडली आणि हातातोंडाशी आलेला विजयाचा घास हिरावला गेला. त्यामुळे डेव्हिड मिलरसुद्धा हताश झाला असून सामन्यानंतर त्याला अश्रू अनावर झाले.



दिल्ली कॅपिटल्सने सामन्यानंतरचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर केला आहे. त्यामध्ये डेव्हिड मिलरच्या चेहऱ्यावरचा हताशपण दिसून येत आहे. शेवटच्या तीन चेंडूत आठ धावांची गरज असताना मिलर स्ट्राईकवर आला होता तसेच त्याने पुढच्याच चेंडूवर प्रसिद्ध कृष्णा याच्या गोलंदाजीवर षटकार ठोकत सामना दिल्लीच्या बाजूने झुकवला होता, पण अखेरच्या दोन चेंडूत दोन धावांची गरज असताना मिलरले पाचव्या चेंडूवर फटका खेळल्यानंतरही धाव घेतली नव्हती.

जर पाचव्या चेंडूवर मिलरने एक धाव घेतली असती तर सामना किमान टाय झाला असता तसेच सुपर ओव्हरमध्ये नव्याने खेळण्याची संधी दिल्लीला मिळाली असती, मात्र त्या चेंडूवर एकेरी धाव घेण्याचे टाळल्यानंतर प्रसिद्ध कृष्णाने टाकलेल्या शेवटच्या चेंडूवर मिलरला फटका खेळता आला नाही. हा चेंडू यष्टीरक्षकाच्या हातात विसावत असताना एकेरी धाव घेण्याच्या प्रयत्नात कुलदीप यादव धावबाद झाल्याने दिल्लीला ही लढत अवघ्या एका धावेने गमवावी लागली होती.

सामन्यानंतर डेव्हिड मिलरच्या चेहऱ्यावर पश्चाताप स्पष्टपणे दिसत होता तसेच त्याला अश्रू आवरणेही कठीण झाले. दरम्यान, दिल्लीचे प्रशिक्षक हेमांग बदानी यांनी मिलरला सावरत त्याची समजूत काढल्याचेही व्हिडीओमधून दिसत आहे.

## रायगड जिल्हास्तरीय बास्केटबॉल निवड चाचणी

**पनवेल : वार्ताहर**

बास्केटबॉल असोसिएशन ऑफ रायगडच्या वतीने १३ वर्षाखालील गटातील मुले व मुली यांच्यासाठी रायगड जिल्हा निवड चाचणीचे आयोजन करण्यात आले आहे. ही चाचणी रविवारी (दि.१२) सकाळी ७ वाजता खांदा कॉलनी सेक्टर ८मधील महात्मा स्कूल येथे होईल.

या निवड चाचणीतून निवडलेला संघ १३ वर्षाखालील गटातील महाराष्ट्र राज्यस्तरीय बास्केटबॉल स्पर्धेत रायगड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करेल. खेळाडूंनी चाचणीसाठी येताना दोन पासपोर्ट आकाराचे फोटो, वयाचा पुरावा आणि निवासाचा पुरावा (आधार कार्ड किंवा समकक्ष कागदपत्र) सोबत आणणे बंधनकारक आहे. अधिक माहितीसाठी खेळाडूंनी आशिष पाटणे (९०२९५९६८८०), मंदार म्हात्रे (८८५०८००२९९) किंवा आकाश चाकणे (९०२९५९६९४९) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.




## विराटचे नाव ऐकताच बाबर आझमची सटकली!

**इस्लामाबाद : वृत्तसंस्था**

पाकिस्तान सुपर लीग (पीसीएल)मध्ये पेशावर झल्मीचे



नेतृत्व करणाऱ्या बाबर आझमचा एका पत्रकारासोबत खडाजंगी झाल्याचा प्रकार समोर आला आहे.

हैदराबाद किंग्समन विरुद्धच्या सामन्यात बाबर आझमने ३७ चेंडूत ४३ धावांची खेळी केली, मात्र संघाला विजय मिळवून देण्यापूर्वीच तो बाद झाला. हैदराबाद किंग्समनने दिलेल्या १४६ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना बाबर चांगल्या फॉर्मात दिसत होता, पण सेट झाल्यानंतरही त्याला ही खेळी मोठ्या धावसंख्येत रूपांतरित करता आली नाही. पेशावर झल्मीने हा सामना शेवटच्या चेंडूवर जिंकला असला, तरी त्याच्या 'फिनिशिंग' क्षमतेवर पत्रकाराने प्रश्नचिन्ह उपस्थित केले. पत्रकाराने त्याची तुलना भारतीय स्टार फलंदाज विराट कोहलीशी केल्याने बाबरचा संयम सुटला.

सामन्यानंतर एका पत्रकाराने बाबरला विचारले की, विराट कोहली तुझ्यासारख्याच शैलीत खेळतो, पण तो नेहमी सामने फिनिश करतो, तुला ते जमत नाही. लोक तुझी विराटशी तुलना करतात, यावर तुझे मत काय?" हा प्रश्न ऐकताच बाबर भडकला. विराट कोहलीबरोबरील तुलना फेटाळून लावताना तो म्हणाला की, हे विषय आता थांबवा आणि स्वतःपुरतेच मर्यादित ठेवा. ही तुलना आता तरी संपवा. मी सामने फिनिश करू शकत नाही, हा तुमचा केवळ गैरसमज आहे.







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com